• वर्ष : ०३ • अंक : ३१३ • पुणे • मंगळवार, दि. ०४ ऑगस्ट २०२६ • मराठी दैनिक • पाने ४ • किंमत : २ रूपये • RNI No.-MAHMAR/2023/89313

दैनिक
# आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com

1,22,570
डिजिटल प्रतींचे दररोज सोशल मीडियाच्या माध्यमातून वितरण होणारे
पुण्यातील लोकप्रिय दैनिक





पिस्टल विक्रीसाठी आलेल्या टोळीचा पर्दाफाश 3



तळमाचीवाडी येथे अतिवृष्टीमुळे भूस्खलन 4

## ठळक बातम्या

### गढूळ पाणी पुरवठ्याने नागरिक त्रस्त

भोर (आरंभ पर्व) : भाटघर धरण शंभर टक्के भरले असतानाही भोर शहरातील नागरिकांना मागील दोन महिन्यांपासून दिवसाआड, कमी दाबाने आणि गढूळ पाणीपुरवठा केला जात आहे. दरवर्षी पाणीटंचाईची पुनरावृत्ती होत असताना भोर नगरपालिकेकडून केवळ तात्पुरत्या उपाययोजना केल्या जात असल्याचा आरोप नागरिकांनी केला असून, कायमस्वरूपी जलपुरवठा योजना राबविण्याची मागणी जोर धरू लागली आहे. भाटघर धरणाच्या खालच्या बाजूस असलेल्या विहिरीतून भोर शहराला पाणीपुरवठा केला जातो. धरणाच्या भिंतीपासून चारी खोदून विहिरीत पाणी आणले जाते. या ठिकाणी १० अश्वशक्ती आणि ६० अश्वशक्ती क्षमतेचे प्रत्येकी दोन पंप बसविण्यात आले आहेत. शहराला दररोज सुमारे ५० लाख लिटर पाण्याची गरज असली, तरी विहिरीत पुरेसे पाणी उपलब्ध होत नसल्याने सध्या दिवसाआड पाणीपुरवठा केला जात आहे.

### आयुक्तांची खुर्ची, लॅपटॉप जप्त करा

पुणे (आरंभ पर्व) : देवाची उरुळी आणि फुरसुंगी परिसरातील कचरा डेपोसाठी संपादित केलेल्या २५ एकर जमिनीचा योग्य मोबदला न दिल्याप्रकरणी थेट महापालिका आयुक्तांच्या कार्यालयातील खुर्ची आणि अन्य साहित्य जप्त करण्याचे आदेश लघुवाद न्यायालयाने दिले. त्यामुळे पालिका प्रशासनाने जप्तीची नामुष्की टाळण्यासाठी तातडीने न्यायालयात १२ कोटी रुपये ११ ऑगस्टपर्यंत जमा करण्याचे हमीपत्र सादर केल्याने पालिकेची अब्रू वाचली आहे. पुणे महापालिकेने उरुळी देवाची आणि फुरसुंगी येथे शेतकऱ्याची कचरा डेपोसाठी शेकडो एकर जमीन संपादित केली आहे. २००५ मध्ये महापालिकेने संपादित केलेल्या १०० एकर जमिनीचे अवॉर्ड झाले. परंतु तीन शेतकऱ्यांना २५ एकर जागेचा मोबदलाच अत्यंत कमी मिळाला. या विरोधात शेतकऱ्यांनी न्यायालयात दाद मागितली होती. न्यायालयाने शेतकऱ्यांना त्यावेळेच्या मोबदल्यानुसार ७० ते ७५ हजार रुपये गुंठा याप्रमाणे भरपाईचे आदेश दिले. परंतु यानंतरही महापालिकेने त्याकडे दुर्लक्ष केले.

### ‘धिंड’ प्रकरणावर आयोगाचा संताप?

पुणे (आरंभ पर्व) : शहरात एका सराईत गुन्हेगाराची भररस्त्यात धिंड काढल्याच्या प्रकरणाची महाराष्ट्र राज्य मानवाधिकार आयोगाने गंभीर दखल घेतली आहे. या घटनेसंदर्भात पुण्याचे पोलीस आयुक्त अमितेशकुमार यांच्यासह संबंधित पोलीस अधिकाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली असून, या कारवाईबाबत सविस्तर खुलासा सादर करण्याचे निर्देश आयोगाने दिले आहेत. संबंधित व्यक्तीविरुद्ध गुन्हे दाखल असले तरी कायद्याची अंमलबजावणी करताना प्रत्येक नागरिकाच्या मानवी हक्कांचे संरक्षण करणे आवश्यक आहे. सार्वजनिक ठिकाणी धिंड काढण्याच्या प्रकारामुळे मानवी हक्कांचे उल्लंघन झाल्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे.

# कृषी सिंचन योजनांचा पाणी प्रश्न मिटला

## पुरंदर तालुक्याच्या दक्षिण भागातील तीन जलाशय तुडुंब : वर्षभर पुरेल एवढा पाणीसाठा उपलब्ध

**सासवड (दै. आरंभ पर्व)**

पुरंदर तालुक्याच्या दक्षिण भागातील रुद्र गंगा आणि केदार गंगा या नद्यांवर असलेले तीन जलाशय तुडुंब भरून वाहत आहेत. हे जलाशय वर्षभर पुरेल इतका पाणीसाठा देत आहेत. या परिसरातील उपसा सिंचन व्यवस्थापन विभागांतर्गत येणारे पिलाणवाडी, माहूर, संगम आणि नव्याने विकसित वडाची मळई जलाशय पूर्ण क्षमतेने भरले आहेत. त्यामुळे अनेक गावांच्या पाणी योजना व कृषी सिंचन योजनांचे पाणी प्रश्न सुटले आहेत. नदीकाठच्या गावांचा पिण्याच्या पाण्याचा आणि शेतीच्या पाण्याचा प्रश्न सुटला आहे.



नदीकाठच्या विहिरींच्या पाणी पातळीत मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. रुद्र गंगा आणि केदार गंगा नद्यांच्या संगमावर असलेला संगम जलाशय (वीर नाला) पूर्ण क्षमतेने भरला आहे. सर्वाधिक पाणी साठवण क्षमता असलेला हा जलाशय आहे, त्याची क्षमता १०.२१ दशलक्ष घनफूट असून उपयुक्त पाणीसाठा ६१.६४ दशलक्ष घनफूट आहे. या जलाशयावर कृषी उपसा जलसिंचन योजना असून ३८२ हेक्टर क्षेत्र ओलिताखाली येत असल्याचे शाखा अभियंता अविनाश जगताप यांनी सांगितले आहे.

पिलाणवाडी जलाशयाची पाणी साठवण क्षमता ६७.४४ दशलक्ष घनफूट असून ६३.८२ दशलक्ष घनफूट इतका उपयुक्त पाणीसाठा आहे. या जलाशयातून आठ गावांना पाणीपुरवठा करणारी शिवरी प्रादेशिक पाणीपुरवठा योजना तसेच जेजुरी महावितरण ४०० केव्ही योजना अवलंबून आहे. या जलाशयाच्या पाण्यावर ३११ हेक्टर क्षेत्रावर सिंचनासाठी पाणीपुरवठा केला जातो. या जलाशयावर परिंचे परिसरासाठी बंद जलवाहिनी कृषी सिंचन योजना करण्यात आली असून गजानन पाणी वाटप संस्था कार्यान्वित आहे. सध्या या पाणी वापर संस्थेच्या माध्यमातून परिंचे परिसरातील अवर्षणग्रस्त भागातील लेंडीच्या ओढ्यावरील बंधारे भरण्यास प्राथमिकता देण्यात आल्याचे शाखा अभियंता अविनाश जगताप यांनी सांगितले आहे. माहूर जलाशयाची पाणी साठवण क्षमता ८४ दशलक्ष घनफूट असून उपयुक्त पाणीसाठा ६४.७२ दशलक्ष घनफूट आहे. दुर्गम भागातील चार गावांना पाणीपुरवठा करणारी धनकवडी प्रादेशिक पाणीपुरवठा योजना या जलाशयाच्या पाणवठ्यावर आहे. माहूरजाई पाणी वापर संस्था या जलाशयावर कार्यान्वित आहे आणि वर्षभर पुरेल असे पाणी वाटपाचे नियोजन केले जाते.



## अदानी पंप स्टोरेज प्रकल्पाविरोधात किसान सभेचे तहसीलदारांना निवेदन

**जुन्नर (दै. आरंभ पर्व)**

अखिल भारतीय किसान सभा, जुन्नर तालुका समितीच्या वतीने जुन्नरचे तहसीलदार तहसीलदार, जुन्नर यांना माळशेज-भोरांडे येथील प्रस्तावित अदानी पंप स्टोरेज प्रकल्पासंदर्भात सविस्तर निवेदन सादर करण्यात आले.


या निवेदनात प्रकल्पग्रस्त शेतकरी, आदिवासी, ग्रामसभा आणि स्थानिक नागरिकांच्या घटनात्मक व कायदेशीर अधिकारांचे संरक्षण करण्याची मागणी करण्यात आली. अनुसूचित क्षेत्रातील कायदा, वनहक्क कायदा, २००६, भारतीय राज्यघटनेतील पाचवी अनुसूची तसेच पर्यावरण संरक्षणासंबंधीच्या कायद्यांचे पालन न करता पर्यावरणीय जनसुनावणी घेऊ नये, अशी किसान सभेची भूमिका आहे. पर्यावरणीय परिणाम अहवाल अपूर्ण व त्रुटीपूर्ण असल्याने तो रद्द करून स्वतंत्र, निष्पक्ष व वैज्ञानिक अभ्यास करण्यात यावा, तसेच कुकडी नदी, माणिकडोह धरण, काळू नदी, वन्यजीव, जैवविविधता, नाणेघाट परिसर आणि प्रस्तावित इतर पंप स्टोरेज प्रकल्पांचा एकत्रित पर्यावरणीय परिणाम अभ्यासल्यानंतरच पुढील निर्णय घ्यावा, अशी मागणी निवेदनात करण्यात आली. घटनात्मक, याशिवाय, महाराष्ट्राचे राज्यपाल यांची लवकरच भेट घेऊन या प्रकल्पासंदर्भातील पर्यावरणीय आणि लोकहिताच्या सर्व बाबी त्यांच्यासमोर मांडण्यात येणार असून, प्रकल्पग्रस्त शेतकरी व आदिवासींच्या न्याय्य हक्कांसाठी किसान सभा सर्व स्तरांवर लढा सुरू ठेवणार असल्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

यावेळी किसान सभेचे जिल्हा उपाध्यक्ष लक्ष्मण जोशी, जुन्नर तालुका सचिव मुकुंद घोडे, तालुका उपाध्यक्ष संजय साबळे, नेते गणपत घोडे, तसेच प्रवीण गवारी, किरण रावते व इतर कार्यकर्ते उपस्थित होते.

## ९ महिन्यांच्या बाळावर कथित अमानुष कृत्य; तिघांविरोधात गुन्हा दाखल

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुण्यातील लोहगाव परिसरातून मानवतेला काळिमा फासणारी धक्कादायक घटना समोर आली आहे. जुन्या कौटुंबिक वादातून अवघ्या ९ महिन्यांच्या बाळाच्या तोंडात फेविक्विक ओतल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी लोहगाव पोलिसांनी एका महिलेसह तिघांविरोधात गुन्हा दाखल केला आहे. गंभीर जखमी झालेल्या बाळावर रुग्णालयात उपचार सुरू असून त्याची प्रकृती चिंताजनक असल्याची माहिती आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ही घटना ३१ जुलै २०२६ रोजी लोहगाव येथील कलवड वस्ती परिसरात घडली. याप्रकरणी अल्ताफ नबी शेख यांनी लोहगाव पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे. फिर्यादीनुसार, फिर्यादी यांची पत्नी जैनाब आणि त्यांची नातेवाईक सानिया शेख यांच्यात काही दिवसांपासून कौटुंबिक कारणावरून वाद सुरू होता.




या वादाचा राग मनात धरून आरोपी सानिया शेख हिने घरात झोपलेल्या अवघ्या ९ महिन्यांच्या अली या बाळाच्या तोंडात फेविक्विक ओतल्याचा आरोप करण्यात आला आहे. ही बाब बाळाच्या आईच्या लक्षात आल्यानंतर तातडीने त्याला रुग्णालयात दाखल करण्यात आले. डॉक्टरांनी बाळावर उपचार सुरू केले असून त्याची प्रकृती गंभीर असल्याचे सांगण्यात येत आहे. या घटनेबाबत कुणालाही माहिती दिली किंवा पोलिसांत तक्रार केली तर जीवे मारण्याची धमकी आरोपी सानिया शेख हिने दिली.

## अणणाभाऊ साठे यांना ‘भारतरत्न’ द्या : उपवर्गीकरणाचा निर्णय रद्द करण्याची मागणी

### धायरीत बहुजन समाज पार्टीकडून साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती उत्साहात साजरी

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

बहुजन समाज पार्टी, पुणे जिल्ह्याच्या वतीने साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती खडकवासला विधानसभा मतदारसंघातील धायरी येथे उत्साहपूर्ण वातावरणात आणि मोठ्या थाटामाटात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाचे आयोजन बहुजन समाज पार्टीचे बारामती लोकसभा प्रभारी तथा खडकवासला विधानसभा निरीक्षक अरुण अण्णा गायकवाड यांनी केले होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी व प्रमुख मार्गदर्शक म्हणून बहुजन समाज पार्टीचे महाराष्ट्र राज्य महासचिव तथा पुणे-खान्देश झोन प्रभारी किरणजी आल्हाट उपस्थित होते. त्यांनी साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या संघर्षमय जीवनकार्यावर प्रकाश टाकत त्यांचे सामाजिक, साहित्यिक आणि परिवर्तनवादी योगदान अधोरेखित केले. यावेळी त्यांनी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांना 'भारतरत्न' हा देशाचा सर्वोच्च नागरी सन्मान प्रदान करण्यात यावा, अशी मागणी केली.




उपवर्गीकरणाच्या मुद्द्यावरून दलित समाजामध्ये निर्माण झालेल्या मतभेदांबाबत बोलताना किरणजी आल्हाट म्हणाले की, सामाजिक न्यायाच्या लढ्यात सर्व घटकांनी मतभेद विसरून एकत्र येणे ही काळाची गरज आहे. उपवर्गीकरणाच्या प्रश्नावर संसदेत सखोल चर्चा करून हा निर्णय रद्द करण्यात यावा, अशीही त्यांनी मागणी केली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या समतेच्या विचारांना पुढे नेण्यासाठी समाजातील सर्व घटकांनी एकजुटीने कार्य करण्याचे आवाहन त्यांनी केले.

यावेळी पुणे जिल्हाध्यक्ष अशोक दादा गायकवाड यांनीही अण्णाभाऊ साठे यांच्या कार्याचा गौरव करत उपवर्गीकरणाच्या विषयावर कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पुणे जिल्हा महासचिव प्रवीण वाकोडे यांनी केले, तर आभार प्रदर्शन आयोजक अरुण अण्णा गायकवाड यांनी मानले.

या कार्यक्रमाला पुणे जिल्ह्याचे कोषाध्यक्ष परशुराम आरुने, जिल्हा सचिव राजरतन शाक्य, खडकवासला विधानसभा प्रभारी मुकेश शेलार, विधानसभा अध्यक्ष सुशील कदम, पुणे लोकसभा प्रभारी आकाश डावकर, दीपक भालेराव, प्रतिभाताई शाक्य, लालसरे साहेब, पुणे जिल्हा कार्यकारिणी सदस्य गणेशजी खंदारे, राम डावकर, मनोज कसबे, निलेश भालेराव, कन्हैया जैस्वार, तसेच पिंपरी-चिंचवड शहराध्यक्ष सुशील गवळी यांच्यासह अनेक पदाधिकारी, कार्यकर्ते व समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमात लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या विचारांचा जागर करत सामाजिक समता, बंधुता आणि न्यायाचा संदेश देण्यात आला. उपस्थितांनी अण्णाभाऊ साठे यांच्या कार्याला अभिवादन करून त्यांच्या विचारांचा वारसा पुढे नेण्याचा निर्धार व्यक्त केला.

## शामकांत शेडगे यांच्या पुढाकारातून व्यसनमुक्तीचा जागर

### १५० हून अधिक बंदीवानांचा उत्स्फूर्त सहभाग; मनोविजय फाउंडेशनच्या माध्यमातून व्यसनांच्या दुष्परिणामांवर प्रभावी मार्गदर्शन

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

येरवडा खुले कारागृहातील बंदीवानांच्या आरोग्यासह त्यांच्या मानसिक आणि सामाजिक पुनर्वसनाला प्राधान्य देत कारागृहाचे अधीक्षक शामकांत शेडगे यांच्या पुढाकारातून व्यसनमुक्तीपर विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. महाराष्ट्र कारागृह विभागाच्या ‘सुधारणा व पुनर्वसन’ धोरणांतर्गत शनिवारी (दि. १ ऑगस्ट २०२६) आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमाला १५० हून अधिक शिक्षाबंदीवानांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.




येरवडा खुले कारागृह आणि पुण्यातील मनोविजय फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने दुपारी साडेचार ते सायंकाळी सहा या वेळेत हा कार्यक्रम पार पडला. बंदीवानांना व्यसनांच्या विळख्यातून बाहेर पडण्यासाठी मानसिक बळ देणे, व्यसनांमुळे होणाऱ्या शारीरिक, आर्थिक व कौटुंबिक दुष्परिणामांची जाणीव करून देणे आणि सुटकेनंतर त्यांना निरोगी व सन्मानपूर्वक जीवन जगण्यासाठी प्रेरित करणे, हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश होता.

हा उपक्रम डॉ. सुहास वारके (भा. पो.से.), अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक, कारागृह व सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे; योगेश देसाई, विशेष कारागृह महानिरीक्षक, कारागृह व सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे आणि सुनील ढमाळ, कारागृह उपमहानिरीक्षक, पश्चिम विभाग, पुणे यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आला. कार्यक्रमाच्या प्रारंभी येरवडा खुले कारागृहाचे अधीक्षक शामकांत शेडगे यांनी प्रमुख मार्गदर्शक तथा मनोविजय फाउंडेशनचे सल्लागार निलेश शिंदे यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. बंदीवानांचे केवळ कारावासापुरते व्यवस्थापन न करता त्यांच्या विचारांमध्ये सकारात्मक बदल घडवून त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात सन्मानाने परत आणण्यासाठी अशा प्रबोधनात्मक उपक्रमांची आवश्यकता असल्याच्या भूमिकेतून या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. निलेश शिंदे यांनी तंबाखू, सिगारेट, मद्य, गांजा तसेच विविध अमली पदार्थांच्या व्यसनामुळे मानवी शरीरावर होणाऱ्या गंभीर दुष्परिणामांची माहिती दिली. व्यसनामुळे व्यक्तीचे शारीरिक व मानसिक आरोग्य बिघडण्याबरोबरच कुटुंबाची आर्थिक आणि सामाजिक घडीही कशी विस्कटते, हे त्यांनी विविध उदाहरणांच्या माध्यमातून स्पष्ट केले.

तरुण पिढीमध्ये वाढत असलेल्या व्यसनाधीनतेबाबतही त्यांनी चिंता व्यक्त केली. महाविद्यालयीन युवक, माहिती-तंत्रज्ञान क्षेत्रातील कर्मचारी तसेच विविध खासगी आस्थापनांमध्ये कार्यरत तरुणांवर जाहिराती, चित्रपट आणि बदलत्या जीवनशैलीचा प्रभाव पडत असल्याचे सांगत व्यसनापासून दूर राहण्याचे आवाहन त्यांनी केले. चुकीच्या मार्गावरून परत फिरणे शक्य असून दृढ इच्छाशक्ती, योग्य समुपदेशन आणि सकारात्मक विचारांच्या जोरावर प्रत्येक व्यक्ती व्यसनमुक्त होऊन समाजात ताठ मानेने व निरोगीपणे जीवन जगू शकते, असा विश्वास त्यांनी बंदीवानांना दिला.

सुवर्णसंधी!
InDesign ऑपरेटरची गरज आहे!
मासिक पगार
आकर्षक पगार दिला जाईल




✓ अनुभवी आणि कल्पक ऑपरेटर हवा
✓ मासिक पगार (पात्रतेनुसार)
✓ इन-डिझाइन सॉफ्टवेअरचे उत्तम ज्ञान
✓ कामाचे लवचिक तास
संपर्क : ७२७६३१४१४२/८६६७८६५७०२

## थोडक्यात पण महत्वाचे



### दहा गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव व आर्थिक मदत

जुन्नर (आरंभ पर्व) : ग्रामीण भागातील होतकरू व गुणवंत विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहन मिळावे, या उद्देशाने बॉर्डरलेस फाऊंडेशनच्या वतीने आणे-माळशेज परिसरात अभिनव व कौतुकास्पद उपक्रम राबविण्यात आला. समूहाच्या बँक ठेवींवरील व्याजातून संचित झालेला निधी तसेच दातृत्ववान सदस्यांच्या आर्थिक सहकार्यातून परिसरातील दहा शाळांमधील गुणवंत विद्यार्थ्यांचा विशेष प्राविण्य प्रशस्तिपत्रक देऊन गौरव करण्यात आला. यासोबतच विद्यार्थ्यांना चालू शैक्षणिक वर्षासाठी आर्थिक मदतीचे वितरण करण्यात आले. या उपक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे फाऊंडेशनचे प्रमुख व सदस्यांनी संबंधित विद्यार्थ्यांच्या घरी प्रत्यक्ष भेट देऊन त्यांच्या पालकांच्या उपस्थितीत विद्यार्थ्यांचा सत्कार केला. या साध्या मात्र प्रभावी उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या पाठीशी समाज खंबीरपणे उभा असल्याची भावना निर्माण झाली. त्यामुळे विद्यार्थी आणि त्यांच्या पालकांमध्ये आनंदाचे वातावरण होते. हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी बॉर्डरलेस फाऊंडेशनचे सहकारी व प्रमुख देविदास नाना तांबे यांनी विशेष परिश्रम घेतले. फाऊंडेशनच्या शैक्षणिक समितीचे पदाधिकारी प्रतिक अकोलकर, शरद माळवे, चंद्रकांत भालेराव, प्रदीप सूर्यवंशी व सुनील ठिकेकर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. विद्यार्थ्यांच्या घरी प्रत्यक्ष जाऊन राबविण्यात आलेल्या या उपक्रमात संदीप शिंगोटे, झावरे, अशोक घोलप आणि संतोष पादीर यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. यावेळी संबंधित शाळांचे मुख्याध्यापक, विद्यार्थी, त्यांचे कुटुंबीय तसेच ग्रामस्थ उपस्थित होते. बॉर्डरलेस फाऊंडेशनच्या या शैक्षणिक व लोकोपयोगी उपक्रमामुळे ग्रामीण भागातील गुणवंत विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहन मिळण्याबरोबरच त्यांच्या शैक्षणिक वाटचालीला नवी दिशा मिळाली आहे. फाऊंडेशनच्या या उपक्रमाचे परिसरातून कौतुक होत आहे.



### आषाढी एकादशीनिमित्त बालचमुंचा दिंडी सोहळा


जुन्नर (आरंभ पर्व) : आषाढी एकादशीनिमित्त बालचमुंचा दिंडी सोहळा नगदवाडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक केंद्रशाळेत आषाढी एकादशीनिमित्त दिंडी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते अशी माहिती मुख्याध्यापिका उज्वला बोऱ्हाडे यांनी दिली. दिंडी सोहळ्यात विद्यार्थ्यांनी आकर्षक वारकरी वेशभूषा करून डोक्यावर तुळस, हातात टाळ व भगव्या पताका घेऊन भक्तीमय वातावरणात गावातून दिंडी काढली शाळेतून निघालेली दिंडी गावातील प्रमुख मार्गावरून जात असताना पुणे जिल्हा परिषदेच्य सदस्या कल्पना काळे व शिरूर लोकसभा मतदारसंघाचे राष्ट्रवादीचे अध्यक्ष वैभवशेठ काळे यांनी गाडी थांबवून विद्यार्थ्यांसोबत फोटो काढत दिंडी उपक्रमाचे कौतुक केले व दिंडी सोहळ्याला शुभेच्छा दिल्या. वारीमध्ये विद्यार्थ्यांनी सादर केलेले रिंगण,टाळ्यांचा,गजर,भजन,गवळण, अभंग व ज्ञानोबा माऊली तुकाराम च्या जयघोषांनी वातावरण दुमदुमून निघाले. सर्वांना केळी व खाऊचे वाटप करण्यात आले. शाळेतील शिक्षक मंगेश मेहेर,पंडित चौगुले,निलेश शेलार,विद्या वाघ,आशा आरेकर,उज्वला कांबळे,स्मिता काळे यांनी आयोजन केले.

### टोयोटा किर्लोस्कर मोटरने भारतात सादर केली नवी ‘हिलक्स’



मुंबई (आरंभ पर्व) : टोयोटा किर्लोस्कर मोटरने भारतात नव्या पिढीतील ऑल-न्यू हिलक्स पिकअप ट्रकचे अनावरण केले आहे. दमदार क्षमता, अत्याधुनिक तंत्रज्ञान, प्रीमियम सुविधा आणि मजबूत सुरक्षितता वैशिष्ट्यांनी सज्ज असलेली ही हिलक्स भारतातील कंपनीच्या एसयूव्ही आणि लाइफस्टाइल वाहनांच्या श्रेणीला अधिक बळकटी देणार आहे. या वाहनासाठी २८ जुलै २०२६ पासून बुकिंग सुरू झाले असून ऑगस्टच्या दुसऱ्या आठवड्यापासून ग्राहकांना डिलिव्हरी दिली जाणार आहे. आयएमव्ही (IMV) प्लॅटफॉर्मवर विकसित करण्यात आलेली नवी हिलक्स व्यावसायिक वापर, दैनंदिन शहरी प्रवास आणि ऑफ-रोड साहसी मोहिमांसाठी तितकीच सक्षम असल्याचा दावा कंपनीने केला आहे. टोयोटा किर्लोस्कर मोटरचे अध्यक्ष, व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी मसाकाझू योशिमुरा यांनी सांगितले की, ग्राहकांच्या बदलत्या गरजा लक्षात घेऊन विश्वासार्ह, टिकाऊ आणि दीर्घकाळ उपयोगी ठरणारी वाहने विकसित करण्यावर कंपनीचा भर आहे. नव्या हिलक्सच्या माध्यमातून ‘सर्वांसाठी गतिशीलता’ या कंपनीच्या संकल्पनेला अधिक बळ मिळणार असल्याचे त्यांनी नमूद केले.

### कृत्रिम बुद्धिमत्तेपेक्षा मानवी बुद्धिमत्तेचे महत्त्व कायम



पुणे (आरंभ पर्व) : कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) झपाट्याने विकसित होत असली तरी मानवी भावना, वर्तन आणि मानसिक आरोग्य समजून घेण्यासाठी मानवी बुद्धिमत्तेचे महत्त्व भविष्यातही कायम राहणार असल्याचे मत तज्ज्ञांनी व्यक्त केले आहे. मानसिक आरोग्याबाबत वाढती जागरूकता आणि प्रशिक्षित मानसशास्त्रज्ञांची वाढती गरज लक्षात घेऊन ज्ञान प्रसाद ग्लोबल विद्यापीठाच्या (डीपीजीयू) स्कूल ऑफ लिबरल आर्ट्समध्ये उद्योगाभिमुख आणि भविष्यकालीन गरजांनुसार मानसशास्त्राचे शिक्षण दिले जात आहे. विद्यापीठामार्फत बी.एस्सी. (ऑनर्स), एम.एस्सी. आणि पीएच.डी. (मानसशास्त्र) हे अभ्यासक्रम उपलब्ध असून विद्यार्थ्यांमध्ये विश्लेषणात्मक विचार, संवाद कौशल्ये, नैतिक मूल्ये आणि व्यावसायिक क्षमता विकसित करण्यावर भर दिला जातो. अभ्यासक्रमात सैद्धांतिक शिक्षणासोबतच केस स्टडी, मानसशास्त्रीय चाचण्या, संशोधन प्रकल्प, इंटर्नशिप आणि उद्योग क्षेत्रातील तज्ज्ञांशी संवाद यांचा समावेश असल्याने विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभव मिळतो.

# मंत्री कार्यालयातील वृत्तपत्रबंदी २४ तासात मागे

## सामान्य प्रशासन विभागाला उपरती, काय होता आदेश?



**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

शासनाच्या वाढत्या खर्चाला आळा घालण्यासाठी मंत्री कार्यालये आणि त्यांची शासकीय निवासस्थाने येथे छापील वृत्तपत्र न घेता ऑनलाईन सदस्यता घेऊन वाचावीत, असा आदेश देणाऱ्या सामान्य प्रशासन विभागाने २४ तासात आपला निर्णय मागे घेतला आहे. सामान्य प्रशासन विभागाने शुक्रवारी सुधारित निर्णय निर्गमित करीत छापील, ऑनलाइन किंवा दोन्ही सदस्यता आपल्या सोईनुसार घ्यावी, असे आदेश दिले आहेत. राज्यात मुख्यमंत्र्यांसह ४१ मंत्री आहेत. मंत्री कार्यालये व निवासस्थान येथे शासनाकडून वृत्तपत्र, मासिके, साप्ताहिके पुरवली जातात. त्याच्या खर्चाची जबाबदारी सामान्य प्रशासन विभागाची असते. या विभागाने गुरुवारी शासन निर्णय जारी करत वृत्तपत्रे यापुढे ऑनलाईन सदस्यता घेऊनच वाचावीत, असा आदेश दिला होता. आश्चर्य म्हणजे मुख्यमंत्री कार्यालय व निवासस्थान यांना मात्र या नियमांतून वगळवले होते. अखेर आज सामान्य प्रशासन विभागाने आपल्या निर्णयात सुधारणा केली. उपमुख्यमंत्री, मंत्री, राज्यमंत्री यांचे कार्यालय व निवासस्थानी वृत्तपत्रे व नियतकालिके ऑनलाईन / छापील सदस्यता, दोन्ही किंवा जे सोयीचे असेल त्याप्रमाणे उपलब्ध करुन घ्यावीत, असा मजकुर नव्या शासन निर्णयात समाविष्ट केला आहे. २४ तासामध्ये शासन निर्णय मागे घेण्याची वेळ सामान्य प्रशासन विभागावर ओढावल्याने या विभागाचे हसे झाले आहे.

धक्कादायक बाब म्हणजे या विभागाचे प्रमुख मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि राज्याचे मुख्य सचिव राजेश आग्रवाल आहेत. अलिकडील काळात शासनाचा प्रत्येक विभाग योजनांच्या प्रसिद्धीसाठी कोटीच्या कोटीचा आराखडा बनवतो. प्रसिद्धी आणि जाहिरातींवर शेकडो कोटींची उधळपट्टी होत असताना वृत्तपत्रांचा वार्षिक जेमतेम २० लाखाचा खर्च शासनाला कसा काय डोईजड होतो, अशी विचारणा केली जात आहे.

### करोना काळात फटका

करोना काळात वृत्तपत्र व्यवसायाला मोठा फटका बसला. त्यावेळी वृत्तपत्र व्यवसायाच्या विरोधात महाविकास आघाडीच्या सरकारने भूमिका घेतली होती. करोना साथीमुळे वृत्तपत्रे विक्री बंद असल्याने जाहिरातीच्या महसूलावर वृत्तपत्रांना पाणी सोडावे लागले. परिणामी, अनेकांना रोजगारास मुकावे लागले. आता छापील वृत्तपत्र घेण्यासच बंदी करून शासनाने सर्वांनाच धक्का दिला.

### दुटप्पी धोरण

एकीकडे शासन दूरचित्रवाहिन्यांवर आपल्या प्रसिद्धीसाठी मोठा खर्च करते आणि दुसरीकडे छापील वृत्तपत्र घेण्याला मात्र बंदी घालते. महायुती सरकारच्या या निर्णयाविरोधात राज्यातील वृत्तपत्र व्यवसायामध्ये मोठा संताप निर्माण झाला आहे. त्यामुळेच मुख्यमंत्री स्वतः प्रमुख असलेल्या सामान्य प्रशासन विभागाला 24 तासात आपला निर्णय मागे घ्यावा लागला आहे.

## ‘मेड इन इंडिया’ रोबोटिक तंत्रज्ञानाची कमाल



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

भारतात विकसित करण्यात आलेल्या रोबोटिक तंत्रज्ञानाने आणि भारतीय डॉक्टरांच्या कौशल्याने पुन्हा एकदा जगाचे लक्ष वेधून घेतले आहे. एसएस इनोवेशन्स इंटरनॅशनलच्या 'मेड इन इंडिया' एसएसआय मंत्रा सर्जिकल रोबोटिक प्रणालीच्या सहाय्याने कोलंबियामध्ये सुमारे २२,००० किलोमीटर दूर बसलेल्या शल्यचिकित्सकांनी इंदूरमधील एका रुग्णावर यशस्वी रोबोटिक स्लीव्ह गॅस्ट्रेक्टॉमी शस्त्रक्रिया करून भारतीय तंत्रज्ञानाची ताकद जगासमोर सिद्ध केली आहे. ही ऐतिहासिक टेलीसर्जरी कोलंबियातील हॉस्पिटल इंटरनॅशनल दि कोलंबिया आणि इंदूर येथील मोहक बॅरियाट्रिक्स अँड रोबोटिक्स यांच्यात सुमारे २२,००० किमी लांबीच्या फायबर नेटवर्कद्वारे पार पडली. या यशामुळे अत्याधुनिक शस्त्रक्रियांसाठी भौगोलिक अंतर हा अडथळा राहिलेला नसल्याचे सिद्ध झाले आहे. या दूरस्थ शस्त्रक्रियेचे नेतृत्व एसएस इनोवेशन्स इंटरनॅशनलचे संस्थापक, अध्यक्ष आणि मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुधीर श्रीवास्तव यांनी डॉ. व्हिक्टर राऊल कॅस्टिलो मँटिला आणि डॉ. जोनाथन कासेरेस प्राडा यांच्यासह कोलंबियातून केले. तर इंदूरमध्ये रुग्णासोबत उपस्थित असलेल्या शस्त्रक्रिया पथकाचे नेतृत्व प्रख्यात बॅरियाट्रिक सर्जन डॉ. मोहित भंडारी यांनी केले.

## पुण्यात छत्तीसगड टुरिझम बोर्डचा रोडशो

### वन्यजीव, वारसा आणि आध्यात्मिक पर्यटनाला नवी चालना



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

छत्तीसगडला विरंगुळा, वन्यजीव, वारसा आणि आध्यात्मिक पर्यटनासाठी देशातील उदयोन्मुख पर्यटनस्थळ म्हणून अधिक प्रभावीपणे सादर करण्याच्या उद्देशाने छत्तीसगड टुरिझम बोर्डने उद्योग भागीदार फिक्कीच्या सहकार्याने पुण्यातील हयात रीजेन्सी येथे पर्यटन रोडशोचे आयोजन केले. या रोडशोमधून महाराष्ट्र आणि छत्तीसगडमधील पर्यटन उद्योगातील प्रतिनिधींमध्ये व्यावसायिक सहकार्य वाढविण्याबरोबरच राज्यातील पर्यटनस्थळांचा प्रचार करण्यावर भर देण्यात आला.

या कार्यक्रमाला छत्तीसगड टुरिझम बोर्डचे अध्यक्ष नीलू शर्मा, व्यवस्थापकीय संचालक विवेक आचार्य (आयएफएस), फिक्की छत्तीसगड टुरिझम समितीचे अध्यक्ष तसेच छत्तीसगड ट्रॅव्हल ट्रेड असोसिएशनचे अध्यक्ष जसप्रीत सिंह भाटिया यांची प्रमुख उपस्थिती होती. याशिवाय छत्तीसगडमधील आघाडीचे टूर ऑपरेटर्स, हॉटेल व्यावसायिक आणि ट्रॅव्हल एजंट्स यांनी पुणे व महाराष्ट्रातील पर्यटन क्षेत्रातील प्रतिनिधींशी बी-टू-बी नेटवर्किंग आणि चर्चासत्रांद्वारे संवाद साधला.

उद्घाटनप्रसंगी नीलू शर्मा म्हणाले की, छत्तीसगडची भारतातील प्रमुख पर्यटनस्थळ म्हणून ओळख अधिक बळकट करण्यासाठी हा रोडशो महत्त्वाचा ठरणार आहे. पर्यटन क्षेत्रातील भागीदारांशी झालेला संवाद अत्यंत फलदायी ठरला असून, छत्तीसगडचा समृद्ध आणि अस्सल अनुभव घेण्यासाठी सर्वांनी राज्याला भेट द्यावी, असे आवाहन त्यांनी केले.

व्यवस्थापकीय संचालक विवेक आचार्य यांनी सांगितले की, पर्यटनासाठी आवश्यक पायाभूत सुविधा विकसित करण्याबरोबरच पर्यटकांचा अनुभव अधिक समृद्ध करण्यासाठी अनेक महत्त्वपूर्ण उपक्रम राबविण्यात येत आहेत.

रोडशोदरम्यान बी-टू-बी नेटवर्किंग सत्रांमध्ये पुणे आणि छत्तीसगडमधील पर्यटन क्षेत्रातील प्रतिनिधींनी व्यावसायिक सहकार्य आणि पर्यटनस्थळांच्या प्रसाराच्या संधींवर सविस्तर चर्चा केली. सायंकाळी छत्तीसगडच्या समृद्ध कला, संस्कृती आणि परंपरेचे दर्शन घडविणारा सांस्कृतिक कार्यक्रम सादर करण्यात आला. त्यानंतर आयोजित नेटवर्किंग डिनरसह एकदिवसीय रोडशोचा समारोप झाला.

पुणे आणि महाराष्ट्रातील पर्यटन व्यवसायाशी संबंधित भागीदारांनी छत्तीसगडमधील विविध पर्यटन सर्किट्सच्या प्रसारासाठी सहकार्य करावे, असे आवाहन त्यांनी केले. निसर्ग, संस्कृती, वारसा आणि साहसी पर्यटनाचा सुंदर संगम असलेले छत्तीसगड आज देशातील पसंतीच्या पर्यटनस्थळांपैकी एक बनत असल्याचे त्यांनी नमूद केले.

## मानाजी नगर, नऱ्हे जाधवर शाळेसमोर महावितरणाचा अजब कारभार

### नागरिकांच्या जीवाशी खेळ – मृत्यूचा सापळा बनला चौक

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

नऱ्हे येथील मानाजी नगरमधील जाधवर शाळेसमोरील चौकात महावितरणाचा विद्युत ट्रान्सफॉर्मर अत्यंत धोकादायक अवस्थेत उभा असून, परिसरातील नागरिकांच्या सुरक्षिततेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. ट्रान्सफॉर्मर परिसरात तुटलेले कुंपण, उघड्या केबल्स, कचऱ्याचा ढिगारा आणि कोणतीही प्रभावी सुरक्षा व्यवस्था नसल्यामुळे हा परिसर अक्षरशः "मृत्यूचा सापळा" बनला आहे. दररोज या चौकातून शेकडो विद्यार्थी, महिला, ज्येष्ठ नागरिक आणि वाहनचालकांची मोठ्या प्रमाणात ये-जा असते. विशेषतः जाधवर शाळेजवळ असल्याने लहान मुलांचा सतत वावर असतो. अशा परिस्थितीत ट्रान्सफॉर्मरभोवती आवश्यक सुरक्षा उपाययोजना नसणे ही अत्यंत गंभीर बाब आहे. पावसाळ्यात अशा उघड्या आणि असुरक्षित विद्युत उपकरणांमुळे अपघात होण्याची शक्यता अधिक वाढते. कोणतीही दुर्घटना घडल्यानंतर उपाययोजना करण्याऐवजी महावितरण प्रशासनाने तातडीने या ट्रान्सफॉर्मरची सुरक्षित दुरुस्ती करून मजबूत कंपाऊंड, सुरक्षित गेट, इशारा फलक आणि परिसराची स्वच्छता करावी, अशी जोरदार मागणी नागरिकांनी केली आहे. "आपला हक्काचा रस्ता संघर्ष समिती" यांच्यावतीने महावितरण प्रशासनाला तातडीने कारवाई करण्याचे आवाहन करण्यात आले असून, वेळेत कार्यवाही न झाल्यास तीव्र लोकआंदोलन छेडण्याचा इशाराही देण्यात आला आहे.

नागरिकांच्या जीविताची जबाबदारी महावितरण प्रशासनाने गांभीर्याने घ्यावी आणि कोणतीही



दुर्घटना घडण्यापूर्वी तातडीने आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी सर्वसामान्य नागरिकांची मागणी आहे.

## पुण्यात सिंहगड रोड परिसरात तरुणाची बेदम मारहाण करून हत्या

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुण्यातील सिंहगड रोड परिसरात २२ वर्षीय तरुणाची बेदम मारहाण करून हत्या करण्यात आल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. पानमळा वसाहत येथील वृंदावन नर्सरीजवळ घडलेल्या या घटनेप्रकरणी सहा जणांसह अन्य दोन ते तीन साथीदारांविरुद्ध गंभीर गुन्हा नोंदविण्यात आला असून पोलीस तपास वेगाने सुरू आहे. पोलिसांच्या माहितीनुसार, शुभम राजू घोडके (वय २२, रा. चरवड वस्ती, वडगाव बुद्रुक, पुणे) असे मृत तरुणाचे नाव आहे. या प्रकरणी विष्णू शिवाजी शिरसाठ (वय २२) यांनी फिर्याद दाखल केली आहे. ही घटना १ ऑगस्ट २०२६ रोजी रात्री सुमारे ९ वाजण्याच्या सुमारास वृंदावन नर्सरीजवळ घडली. फिर्यादीनुसार, आरोपींनी बेकायदेशीर जमाव करून शुभम घोडके याला अडवले. त्यानंतर हा पठारावरचा आहे, मारा याला, असे म्हणत त्याच्यावर लाथाबुक्क्यांनी आणि हाताने बेदम मारहाण केली. या हल्ल्यात शुभम गंभीर जखमी झाला आणि उपचारापूर्वीच त्याचा मृत्यू झाला. या प्रकरणी अर्जुन कांबळे, अनिकेत कांबळे, गणेश कदम, प्रथमेश लोंढे, अंकुश काळे, मुकुंद राजगुरू, अथर्व शेळके तसेच त्यांच्या अन्य दोन ते तीन साथीदारांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## नूतन इंग्लिश मिडियम स्कूलच्या विद्यार्थ्यांची चमकदार कामगिरी

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

धायरी येथील नूतन इंग्लिश मिडियम स्कूलच्या विद्यार्थ्यांनी नुकत्याच आयोजित करण्यात आलेल्या इंटर स्कूल स्केटिंग स्पर्धेत उल्लेखनीय यश संपादन करत शाळेच्या नावलौकिकात भर घातली. स्पर्धेत श्रीनीत चोटलिया याने उत्कृष्ट कामगिरी करत सुवर्णपदक पटकावले. तसेच स्वानंद पाटकर, शौर्य जाधव आणि साई हंकुणे यांनी दमदार प्रदर्शन करत कांस्यपदक मिळविले. याशिवाय सुयोग पाटकर, शार्दुल चव्हाण, अरमान जमादार आणि आर्या कुचेकर यांना स्पर्धेतील सहभागाबद्दल सहभाग प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. या स्पर्धेसाठी विद्यार्थ्यांना



प्रकाश पालकर यांनी मोलाचे मार्गदर्शन केले. त्यांच्या प्रशिक्षणामुळे विद्यार्थ्यांनी आत्मविश्वासाने उत्कृष्ट कामगिरी करत शाळेचे नाव उंचावले. या यशाबद्दल विद्यार्थ्यांचे शाळेच्या संस्थापक अध्यक्षा सौ. सुनीता डांगे, प्राचार्या प्रियांका गुजराती, शिक्षकवृंद तसेच पालकांनी अभिनंदन करून त्यांच्या भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## कै. नारायणराव नवले प्राथमिक शाळेत गुरुपौर्णिमा उत्साहात साजरी



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

कै. नारायणराव नवले प्राथमिक शाळा, मनपा शाळा क्रमांक ५६ बी, वडगाव खुर्द, पुणे येथे गुरुपौर्णिमा उत्सव अत्यंत उत्साहपूर्ण आणि भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे उत्कृष्ट नियोजन शिक्षिका स्वाती पडवळ यांनी केले होते. कार्यक्रमाची सुरुवात इयत्ता सातवीतील विद्यार्थिनींनी सादर केलेल्या स्वागतगीत व ईशस्तवनाने झाली. त्यानंतर गुरुपौर्णिमेनिमित्त क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे तसेच सरस्वती देवीच्या मूर्तीचे पूजन करण्यात आले. यावेळी स्टेज व पूजनस्थळाची आकर्षक सजावट सर्वांचे लक्ष वेधून घेत होती.

या कार्यक्रमास इयत्ता पहिली ते सातवीपर्यंतचे सर्व विद्यार्थी उपस्थित होते. प्रत्येक वर्गातील एका विद्यार्थ्याने गुरुपौर्णिमेचे महत्त्व, प्रेरणादायी गोष्टी, श्लोक आणि प्रार्थना सादर करून गुरुंबद्दलची कृतज्ञता व्यक्त केली.

इयत्ता सातवीच्या विद्यार्थ्यांनी शाळेतील सर्व शिक्षकांचा श्रीफळ व गुलाबपुष्प देऊन सत्कार केला. तसेच संयम ऑलिंपियाडतर्फे शाळेचा, मार्गदर्शक (मेंटॉर) म्हणून स्वाती पडवळ मॅडम यांचा आणि ऑलिंपियाडमधील तीन गुणवंत विद्यार्थ्यांचा विशेष सन्मान करण्यात आला.

यावेळी शिक्षक वैभव फटांगरे आणि विनया सूर्यवंशी यांनी मनोगत व्यक्त करत गुरूंच्या कार्याचे महत्त्व सांगितले. कार्यक्रमाचे छायाचित्रण विजय कदम यांनी केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेच्या प्रभारी मुख्याध्यापिका सुमन गंथडे होत्या. याप्रसंगी शिक्षकवृंद संध्या चांदगुडे, अनिता शितोळे, आशा नवगिरे, गणेश पतंगे, यादव साबळे, सविता रासोटे, संगीता जागडे, रेश्मा नवले आणि उर्मिला दराडे उपस्थित होते.

अध्यक्षीय मनोगत आणि आभार प्रदर्शनानंतर कार्यक्रमाची सांगता झाली. विद्यार्थ्यांमध्ये गुरुंबद्दल आदर, संस्कार आणि कृतज्ञतेची भावना दृढ करणारा हा गुरुपौर्णिमा उत्सव अतिशय सुंदर आणि संस्मरणीय वातावरणात पार पडला.

## पुण्यात छत्तीसगड टुरिझम बोर्डचा रोडशो; राज्यातील वन्यजीव, वारसा आणि आध्यात्मिक पर्यटनाला नवी चालना

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

छत्तीसगडला विरंगुळा, वन्यजीव, वारसा आणि आध्यात्मिक पर्यटनासाठी उदयोन्मुख पर्यटनस्थळ म्हणून देशभरात अधिक प्रभावीपणे सादर करण्याच्या उद्देशाने छत्तीसगड टुरिझम बोर्ड ने उद्योग भागीदार फिक्की यांच्या सहकार्याने आज पुण्यातील हयात रीजेन्सी येथे यशस्वी छत्तीसगड टुरिझम रोडशो आयोजित




केला. या रोडशोमध्ये छत्तीसगडमधील आघाडीचे टूर ऑपरेटर्स, हॉटेल व्यावसायिक आणि ट्रॅव्हल एजंट्स यांनी पुणे तसेच महाराष्ट्रातील पर्यटन व्यवसायाशी संबंधित प्रतिनिधींशी बीरबी नेटवर्किंग आणि चर्चासत्रांद्वारे संवाद साधत व्यावसायिक सहकार्याच्या नव्या संधींचा शोध घेतला. या कार्यक्रमाला छत्तीसगड टुरिझम बोर्ड चे अध्यक्ष श्री नीलू शर्मा, छत्तीसगड टुरिझम बोर्ड चे व्यवस्थापकीय संचालक श्री विवेक आचार्य (आयएफएस) तसेच फिक्की छत्तीसगड टुरिझम समिती चे अध्यक्ष आणि छत्तीसगड ट्रॅव्हल ट्रेड असोसिएशन चे अध्यक्ष श्री जसप्रीत सिंह भाटिया उपस्थित होते.

उद्घाटनप्रसंगी बोलताना श्री नीलू शर्मा म्हणाले, “भारतातील प्रमुख पर्यटनस्थळांपैकी एक म्हणून छत्तीसगडची ओळख अधिक बळकट करण्याची संधी मिळाल्याचा आम्हाला आनंद आहे. हॉटेल व्यावसायिक, ट्रॅव्हल एजंट्स आणि टूर ऑपरेटर्स यांच्याशी झालेला संवाद अत्यंत फलदायी ठरला. आम्ही सर्व पर्यटन क्षेत्रातील भागीदारांना छत्तीसगडचा समृद्ध आणि अस्सल अनुभव घेण्यासाठी मनःपूर्वक आमंत्रित करतो.”

श्री विवेक आचार्य (आयएफएस) म्हणाले, “पर्यटनासाठी आवश्यक पायाभूत सुविधा विकसित करण्यासोबतच पर्यटकांचा अनुभव अधिक समृद्ध करण्यासाठी छत्तीसगड टुरिझम बोर्ड ने अनेक महत्त्वपूर्ण उपक्रम हाती घेतले आहेत. पुणे आणि महाराष्ट्रातील पर्यटन व्यवसायाशी संबंधित भागीदारांनी राज्यातील विविध पर्यटन सर्किट्स आणि अनुभवांच्या प्रसारासाठी आमच्यासोबत सहकार्य करावे, असे आम्ही आवाहन करतो.

दैनिक आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com
मंगळवार, दि. ०४ ऑगस्ट २०२६






## थोडक्यात पण महत्वाचे



### अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीचे पंचनामे करून त्वरित भरपाई द्या

जुन्नर (आरंभ पर्व) : जुन्नरच्या दुर्गम आदिवासी भागात अतिवृष्टीमुळे ग्रामीण भागातील घरांचे, घरातील संसारोपयोगी साहित्याचे, जनावरांच्या गोठ्यांचे तसेच भात पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान आले आहे. ह्या नुकसानीचे तात्काळ पंचनामे करून त्वरित नुकसानभरपाई देण्यात यावी अशी मागणी अखिल भारतीय किसान सभा, जुन्नर तालुका समितीच्या वतीने तहसीलदारांकडे करण्यात आली. याबाबत किसान सभेने निवेदन प्रसिद्धीस दिले आहे. ह्या निवेदनात गेल्या काही दिवसांतील मुसळधार पावसामुळे जुन्नर तालुक्यातील अनेक गावांमध्ये कच्ची व पक्की घरे बाधित झाली असून अनेक घरांमध्ये पावसाचे पाणी शिरल्याने नागरिकांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. तसेच भात पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाल्याने शेतकरी गंभीर संकटात सापडले आहेत. प्रशासनाने तातडीने पंचनामे करून नुकसानभरपाई द्यावी, नुकसानग्रस्त कुटुंबांना आर्थिक मदत व आवश्यक जीवनावश्यक साहित्य उपलब्ध करून द्यावे. अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष पाहणी करून त्वरित कार्यवाही करावी, अशी मागणी करण्यात आली. यावेळी किसान सभेचे तालुका अध्यक्ष कोडिभाऊ बांबळे, सचिव मुकुंद घोडे, सहसचिव नारायण वायळ, उपाध्यक्ष संजय साबळे, लक्ष्मण जोशी, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे तालुका सचिव गणपत घोडे, डीवायएफआय चे राजू शेळके, एसएफआय चे अक्षय घोडे, सूरज बांबळे, स्वामी गवारी, संदीप शेळकंदे, किसन घोडे, अक्षय साबळे आदींसह उपस्थित होते.



### समाजात विद्वत्ता आणि नम्रतेचा संगम होण्याची गरज : ना. चंद्रकांत पाटील

पुणे (आरंभ पर्व) : ज्यांच्याकडे विद्वत्ता आणि कर्तृत्व आहे, त्यांनी अधिकाधिक नम्र व्हायला हवे, तर जे नम्र आहेत त्यांनी अधिकाधिक कर्तृत्व गाजवण्याची आकांक्षा बाळगली पाहिजे. एकूणच समाजात आज विद्वत्ता आणि नम्रता यांचा संगम होण्याची गरज आहे. आज ज्या समाजगुरुंचा सन्मान करण्यात आला, त्यांच्या ठायी हा संगम झालेला दिसून येतो, असे मत महाराष्ट्राचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री ना. चंद्रकांतदादा पाटील यांनी व्यक्त केले. विद्या प्रबोधिनी आणि पुनर्निर्माण सोशल फाउंडेशनच्या वतीने गुरुपौर्णिमेच्या निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या समाजगुरुंच्या सन्मान सोहळ्यात प्रमुख अतिथी म्हणून ना. पाटील बोलत होते. यावेळी प्रास्ताविकात जडणघडण मासिकाचे मुख्य संपादक डॉ. सागर देशपांडे यांनी विविध क्षेत्रातील समाजगुरुंचा परिचय करून दिला. यावेळी पर्यावरण तज्ज्ञ आणि नोबेल पुरस्काराचे सहमानकरी डॉ. राजेंद्र शेंडे, डेक्कन कॉलेज अभिमत विद्यापीठाचे कुलपती डॉ. भूषण पटवर्धन, निवृत्त लेफ्टनंट जनरल डॉ. राजेंद्र निंभोरकर, पुणे सार्वजनिक सभेचे उपाध्यक्ष डॉ. अरविंद नवरे, लेखक व संपादक आनंद हर्डीकर, लेखिका आणि अनुवादक मृणालिनी सावंत, प्रसिद्ध गायक आणि दिग्दर्शक आनंद माडगूळकर, प्रख्यात शिल्पकार प्रमोद कांबळे, जगातील सर्व सात खंडांमधील सर्वोच्च शिखरे सर करणारे विक्रमवीर शरद कुलकर्णी, ग्रंथप्रसारक आणि रुरल रिलेशन्सचे प्रमुख प्रदीप लोखंडे, इतिहास संशोधक अनुराधा कुलकर्णी यांचा शाल, पुष्पगुच्छ आणि भेटवस्तू देऊन प्रमुख अतिथी चंद्रकांतदादा पाटील यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. त्यानंतर डॉ. राजेंद्र शेंडे आणि आनंद माडगूळकर यांनी आपले मनोगत व्यक्त करताना राज्याचे शिक्षणमंत्री स्वतःहून दरवर्षी विविध क्षेत्रातील समाजगुरुंचा आवर्जून सन्मान करतात, याबद्दलचा आनंद आणि कृतज्ञता व्यक्त केली. सहकार सुगंध मासिकाचे संपादक भालचंद्र कुलकर्णी यांनी आभार मानले तर अनिरुद्ध दडके यांनी सूत्रसंचालन केले.



### युवासेना पुणे महानगर अध्यक्षपदी हेमंत बागुल यांची नियुक्ती

पुणे (आरंभ पर्व) : पुणे शहरात शिवसेनेची संघटनात्मक ताकद अधिक बळकट करण्याबरोबरच युवकांच्या सर्वांगीण विकासाला चालना देण्याच्या उद्देशाने उच्चशिक्षित, अभ्यासू आणि व्यवसायाने आर्किटेक्ट असलेल्या हेमंत बागुल यांची युवासेना पुणे महानगर अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. शिवसेनेचे मुख्य नेते तथा राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या आदेशानुसार आणि खासदार डॉ. श्रीकांत शिंदे , उद्योगमंत्री उदय सामंत यांच्या मार्गदर्शनाखाली ही नियुक्ती करण्यात आल्याची माहिती युवासेनेचे कार्याध्यक्ष पुर्वेश सरनाईक आणि सचिव किरण साळी यांनी दिली. राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत तसेच शिवसेना नेत्या डॉ. निलम गोऱ्हे यांच्या हस्ते हेमंत बागुल यांनी नियुक्तीपत्र स्वीकारले. यावेळी त्यांनी पक्षाने सोपविलेली जबाबदारी पूर्ण निष्ठेने आणि प्रामाणिकपणे पार पाडण्याची ग्वाही दिली. शिवसेनेची ध्येय-धोरणे समाजातील सर्व घटकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी तसेच युवकांच्या सर्वांगीण विकासाला सर्वोच्च प्राधान्य देण्यासाठी आपण कटिबद्ध असल्याचे त्यांनी सांगितले.

### अण्णाभाऊ साठे जयंती महोत्सवात लोकशाहीरांच्या विचारांना अभिवादन



पुणे (आरंभ पर्व) : लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त रामोशी गेट येथील श्रीमती सावित्रीबाई फुले प्रशाला येथे भव्य जयंती महोत्सव उत्साहात पार पडला. सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीत झालेल्या या कार्यक्रमात अण्णाभाऊ साठे यांच्या कार्याला अभिवादन करण्यात आले. त्यानंतर आयोजित सुप्रसिद्ध चंदन कांबळे यांच्या गाण्याच्या कार्यक्रमाने उपस्थितांची मने जिंकली. यावेळी विविध मान्यवरांनी अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्य, शाहिरी आणि सामाजिक कार्याचा गौरव करत त्यांच्या विचारांचा वारसा पुढे नेण्याचे आवाहन केले. "गिरणी कामगारांचे अश्रू पुसण्यासाठी अण्णाभाऊ साठे खंबीरपणे उभे राहिले," असे मत अनेक वक्त्यांनी व्यक्त केले.

# पिस्टल विक्रीसाठी आलेल्या टोळीचा पर्दाफाश, तीन जण अटकेत

## येरवडा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक उमेश गित्ते यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांची मोठी कारवाई

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

येरवडा पोलिसांनी बेकायदेशीर शस्त्र बाळगणाऱ्या आणि देशी बनावटीचे पिस्टल विक्रीसाठी आणलेल्या तिघा जणांना अटक करत मोठी कारवाई केली आहे. या कारवाईत एक देशी बनावटीचे पिस्टल, एक जिवंत काडतूस आणि दुचाकीसह ९० हजार ८०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. अटक करण्यात आलेल्या दोघांविरुद्ध यापूर्वीही खूनाचा प्रयत्न, शस्त्र बाळगणे आणि संघटित गुन्हेगारी प्रतिबंधक कायद्यांतर्गत गंभीर गुन्हे दाखल असल्याचे तपासात समोर आले आहे.



पोलीस आयुक्त अमितेश कुमार, सहपोलीस आयुक्त संजय दराडे, अपर पोलीस आयुक्त मनोज पाटील आणि पोलीस उपायुक्त चिलुमुला रजनीकांत यांनी शहरात अवैध शस्त्रधारकांविरुद्ध विशेष मोहीम राबविण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार येरवडा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक उमेश गित्ते यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक (गुन्हे) केशव विंडे यांच्या नेतृत्वाखालील तपास पथकाने ही कारवाई केली.

२८ जुलै रोजी रात्री साडेनऊच्या सुमारास तपास पथक येरवडा परिसरात गस्त घालत असताना पोलीस अंमलदार बालाजी सोगे यांना गुप्त माहिती मिळाली. चव्हाण चौकातून मुळीक फार्मकडे जाणाऱ्या रस्त्यावरील मोकळ्या जागेत तीन संशयित युवक देशी बनावटीचे पिस्टल घेऊन कोणाची तरी वाट पाहत असल्याची माहिती मिळताच पोलीस उपनिरीक्षक किशोर बेरड यांनी वरिष्ठांना माहिती दिली. त्यानंतर पोलिसांनी घटनास्थळी सापळा रचला. संशयित दुचाकीवरून पसार होण्याच्या तयारीत असतानाच पोलिसांनी त्यांना शिताफीने पकडले. झडतीदरम्यान त्यांच्याकडून एक देशी बनावटीचे पिस्टल आणि एक जिवंत काडतूस जप्त करण्यात आले.

अटक करण्यात आलेल्यांची नावे महेश अशोक कांबळे (वय २१, भुगाव), गणेश तुळशीराम पवार (वय २२, नांदेड सिटी) आणि यश चंद्रकांत उरणकर (वय २२, पाषाण) अशी आहेत. चौकशीत महेश कांबळे याने जप्त केलेले पिस्टल विक्रीसाठी आणल्याची कबुली दिल्याची माहिती पोलिसांनी दिली.

या प्रकरणी येरवडा पोलीस ठाण्यात शस्त्र अधिनियम आणि महाराष्ट्र पोलीस अधिनियमातील विविध कलमांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून तिन्ही आरोपींना अटक करण्यात आली आहे. त्यांच्याकडून ४० हजार रुपयांचे देशी पिस्टल, ८०० रुपयांचे जिवंत काडतूस आणि ५० हजार रुपयांची दुचाकी असा एकूण ९० हजार ८०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. तपासादरम्यान आरोपी महेश कांबळे याच्याविरुद्ध यापूर्वी नऱ्हे पोलीस ठाण्यात शस्त्र बाळगल्याचा गुन्हा दाखल असल्याचे उघड झाले. तसेच आरोपी गणेश पवार याच्याविरुद्ध हवेली पोलीस ठाण्यात खुनाचा प्रयत्न, मारहाण, बेकायदेशीर जमाव तसेच शस्त्र अधिनियमांतर्गत गुन्हा नोंद असून, वारजे माळवाडी पोलीस ठाण्यात संघटित गुन्हेगारी प्रतिबंधक कायद्यांतर्गत (मोक्का) देखील गुन्हा दाखल असल्याची माहिती समोर आली आहे.

या आरोपींकडे शस्त्र कोठून आले, ते कोणाला विकले जाणार होते, तसेच त्यांच्या मागे आणखी कोणते गुन्हेगारी जाळे कार्यरत आहे का, याचा तपास येरवडा पोलिसांनी सुरू केला आहे.

या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक किशोर बेरड करत आहेत. ही कारवाई वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली येरवडा पोलीस ठाण्याच्या तपास पथकाने केली. पोलीस उपनिरीक्षक किशोर बेरड, मुकुंद कोकणे, बालाजी सोगे, शैलेश वाबळे, संदीप जायभाये, नटराज सुतार, गणेश पालवे, साईनाथ म्हस्के, अनिल मन्हाळकर आणि सोमनाथ गायकवाड यांनी या कारवाईत सहभाग घेतला.



"पुणे शहरात बेकायदेशीर शस्त्रे बाळगणारे तसेच त्यांची विक्री करणाऱ्यांविरोधात येरवडा पोलिसांची कारवाई यापुढेही कठोरपणे सुरू राहणार आहे. या कारवाईत देशी बनावटीचे पिस्टल विक्रीसाठी घेऊन आलेल्या तिघांना अटक करण्यात आली आहे. जप्त केलेले शस्त्र नेमके कोठून आणण्यात आले, ते कोणाला विकले जाणार होते आणि यामागे आणखी कोणाचे जाळे सक्रिय आहे का, याचा सखोल तपास सुरू आहे. अवैध शस्त्रांच्या माध्यमातून होणाऱ्या गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी अशा कारवाया सातत्याने केल्या जातील."

**- उमेश गित्ते, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, येरवडा पोलीस ठाणे**

## स्वच्छतागृहांची ऐशी तैशी... किती दिवस?

- **धायरेश्वर मंदिराजवळील सार्वजनिक स्वच्छतागृहातून सांडपाणी रस्त्यावर; नागरिक संतप्त**

**धायरी (दै. आरंभ पर्व)**

धायरी परिसरातील धायरेश्वर मंदिराजवळील सार्वजनिक स्वच्छतागृहाची अत्यंत दयनीय अवस्था झाली असून, स्वच्छतागृहातील सांडपाणी थेट रस्त्यावर वाहत आहे. त्यामुळे परिसरात दुर्गंधी पसरली असून भाविक, नागरिक आणि परिसरातील व्यावसायिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. 'स्वच्छ भारत' अभियानाचा गाजावाजा होत असताना प्रत्यक्षात सार्वजनिक स्वच्छतागृहांची अशी अवस्था असल्याने प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. समाविष्ट गावांतील अनेक सार्वजनिक स्वच्छतागृहे अस्वच्छ असून त्यांच्या देखभालीकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. यासंदर्भात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे विधानसभा प्रमुख शिवाजी मते यांनी प्रशासनावर टीका करत, "स्वच्छ स्वच्छतागृह दाखवा आणि बक्षीस मिळवा" ही मोहीम लवकरच शिवसेनेतर्फे राबविण्यात येणार असल्याची घोषणा केली. "धायरी परिसरातील एकही सार्वजनिक स्वच्छतागृह स्वच्छ आढळल्यास संबंधित नागरिकाला बक्षीस दिले जाईल. कारण येथे प्रशासन पूर्णपणे सुस्त झाले असून नागरिकांच्या मूलभूत सुविधांकडे दुर्लक्ष केले जात आहे," असे त्यांनी म्हटले. नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न लक्षात घेऊन प्रशासनाने तातडीने सर्व सार्वजनिक स्वच्छतागृहांची स्वच्छता, दुरुस्ती आणि नियमित देखभाल करावी, अशी मागणी स्थानिकांकडून करण्यात येत आहे.

## ओपनिंगलाच 'नॉट आऊट शतक'!

- **पोलीस निरीक्षक अमोल कादबाने यांच्या नेतृत्वाखाली धामणगावातील युनिकॉर्न चोरीचा छडा; चोरांना शिकवला धडा!**

**वैराग (दै. आरंभ पर्व)**

वैराग पोलीस ठाण्यात नुकतेच पोलीस निरीक्षक म्हणून रुजू झालेले अमोल कादबाने यांनी रुजू होताच आपल्या कर्तृत्वाची चुणूक दाखवत धामणगाव (ता. बार्शी) येथील नव्याकोऱ्या युनिकॉर्न दुचाकी बरोबरच घरफोडी ' शेळगाव येथील शेळ्या चोऱ्याचा छडा लावला. या यशस्वी कारवाईमुळे वैराग परिसरात त्यांच्या कामगिरीची सर्वत्र चर्चा सुरू असून, शेजारच्या हद्दीत खुंटेवाडी येथे झालेल्या चोरीचाही छडा लागणार आहे "ओपनिंगलाच नॉट आऊट शतक" अशी प्रतिक्रिया नागरिकांकडून व्यक्त होत आहे. धामणगाव येथील अजय गरड यांनी शिक्षण पूर्ण करून नुकतीच नोकरी सुरू केली होती. स्वर्गीय वडिलांच्या इच्छेनुसार स्वतःच्या कष्टातून त्यांनी घेतलेली नवी युनिकॉर्न दुचाकी चोरीला गेल्याने अजय गरड व त्यांच्या आईवर मोठा मानसिक आघात झाला. घटनेची माहिती धामणगावचे पोलीस पाटील गणेश मसाळ यांनी तात्काळ पोलीस निरीक्षक अमोल कादबाने यांना दिली.



घटनेचे गांभीर्य ओळखून पोलीस निरीक्षक कादबाने यांनी तातडीने तपासाची सूत्रे हाती घेतली. त्यांच्या नेतृत्वाखाली पोलीस उपनिरीक्षक प्रतापसिंह जाधव विक्रम ओढणे संदेश पवार, अभिजीत गाटे, श्रीमंत शिंगाडे सुखदेव सलगर, अमृत गुरव, अमोल भोरे समीर पठाण, आणि मुकुंद माळी या अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या पथकाने अथक परिश्रम घेत तांत्रिक व गोपनीय माहितीच्या आधारे आरोपींचा शोध घेतला. अखेर चोरट्यांना जेरबंद करून चोरीस गेलेली युनिकॉर्न शेळ्या घरफोडीतील दहा हजार हस्तगत करण्यात पोलिसांना यश आले. या उल्लेखनीय कामगिरीमुळे वैराग पोलीस ठाण्याच्या कार्यक्षमतेबद्दल नागरिकांमध्ये समाधान व्यक्त होत असून, पोलीस निरीक्षक अमोल कादबाने यांच्या नेतृत्वाचे कौतुक होत आहे. तर या कामगिरीत दोन रात्र वेशांतर करून गुन्हेगारांच्या हालचालीवर लक्ष ठेवणाऱ्या संदेश पवार अभिजित गाटे सुखदेव सलगर यांच्या कामगिरीचे विशेष कौतुक पो .नि अमुल कादबाने यांनी केले

ही कारवाईपोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी अप्पर पोलीस अधीक्षक विजय कबाडे विभागीय पोलीस अधीक्षक सुहास जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली चालू आहे

चोरीस गेलेली दुचाकी परत मिळाल्यानंतर अजय गरड यांनी पो .नि अमुल कादबाने व वैराग पोलीस ठाण्याचे यांचे मनःपूर्वक आभार मानले.

# घनकचरा व्यवस्थापन कंत्राटाला नव्हे, तर कार्यपद्धतीला आमचा विरोध

## कंत्राटदाराने प्रथम स्पष्ट आराखडा सादर करावा : काकासाहेब चव्हाण

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुणे महानगरपालिकेच्या ३० जुलै रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेत घनकचरा व्यवस्थापनाच्या नव्या कंत्राटावरून मोठा गदारोळ झाला. या विषयावर बोलताना राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे गटनेते काकासाहेब चव्हाण यांनी स्पष्ट केले की, महानगरपालिकेने घनकचरा व्यवस्थापनासाठी कंत्राट देण्यास आमचा विरोध नाही, मात्र सदर कंत्राटाची कार्यपद्धती, नियोजनातील त्रुटी आणि कचरा व्यवस्थापनाबाबत असलेला स्पष्टतेचा अभाव यालाच आमचा विरोध आहे. काकासाहेब चव्हाण म्हणाले की, पुणे शहरातून दररोज मोठ्या प्रमाणात कचरा संकलित केला जात असला तरी त्याच्या अंतिम विल्हेवाटीसाठी महानगरपालिकेकडे स्पष्ट, सक्षम आणि व्यवहार्य कार्यपद्धती उपलब्ध नसल्याचे दिसून येते. माझ्या प्रभाग क्रमांक ३३ मध्ये कचरा उचलला गेला तर प्रक्रिया केंद्रांमध्ये कचरा स्वीकारला जात नसल्याने अनेक ठिकाणी कचऱ्याचे ढीग साचलेले आहेत.



अशा परिस्थितीत केवळ कोट्यवधी रुपयांचे कंत्राट देऊन शहर स्वच्छ होणार नाही. सर्वप्रथम कचऱ्याची प्रक्रिया आणि अंतिम विल्हेवाट नेमकी कशी लावली जाणार, याचा स्पष्ट आराखडा नागरिकांसमोर आणि लोकप्रतिनिधींसमोर ठेवणे आवश्यक आहे.

त्यांनी पुढे सांगितले की, या प्रकल्पातून निर्माण होणाऱ्या रिजेक्ट कचऱ्याची विल्हेवाट कशी लावली जाणार, याबाबतही कंत्राटदार किंवा प्रशासनाने कोणतीही ठोस माहिती दिलेली नाही. तसेच हे कंत्राट सुरुवातीला केवळ तीन महिन्यांसाठी देण्यात येत असून, त्यानंतर ते सुरू राहिले नाही तर या कंपनीत काम करणाऱ्या शेकडो कर्मचाऱ्यांच्या रोजगाराचा आणि त्यांच्या कुटुंबांच्या उदरनिर्वाहाचा गंभीर प्रश्न निर्माण होऊ शकतो. त्यामुळे कंत्राटदाराने शहरातील स्वच्छता व्यवस्थापनाचा संपूर्ण आराखडा, तांत्रिक क्षमता, प्रक्रिया व्यवस्था आणि कामकाजाची पद्धत याबाबत सर्व नगरसेवकांसमोर सविस्तर सादरीकरण करावे, अशी आमची मागणी आहे. मात्र या मागणीलाही प्रशासन आणि कंत्राटदाराकडून कोणताही सकारात्मक प्रतिसाद मिळालेला नाही. काकासाहेब चव्हाण यांनी निविदेच्या अभ्यासादरम्यान अनेक तांत्रिक, आर्थिक आणि प्रशासकीय त्रुटी निदर्शनास आल्याचा दावा केला. अनेक रस्त्यांची लांबी प्रत्यक्षापेक्षा अधिक दाखविण्यात आल्याने संपूर्ण निविदेची फेरपडताळणी आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. संबंधित विभाग, क्षेत्रीय कार्यालय, अभियंते आणि स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्या संयुक्त पाहणीतून प्रत्येक रस्त्याचे प्रत्यक्ष मोजमाप करून अंतिम लांबी निश्चित करण्यात यावी. तसेच ज्या प्रमुख रस्त्यांवर यांत्रिक झाडण केली जाणार आहे, त्या रस्त्यांचा समावेश मानवी झाडणकामाच्या कामकाजातून वगळला जावा,जेणेकरून दुहेरी खर्च टाळता येईल.

अनेक प्रभागांमध्ये समान रस्त्यांची पुनरावृत्ती झाल्याने रस्त्यांची एकूण लांबी कृत्रिमरीत्या वाढल्याचेही त्यांनी निदर्शनास आणले. खाजगी गृहनिर्माण संस्थांमधील अंतर्गत रस्त्यांचा समावेश कायदेशीरदृष्ट्या आणि प्रत्यक्ष आवश्यकतेच्या दृष्टीने तपासण्यात यावा. या सर्व बाबींची योग्य पडताळणी झाल्यास रस्त्यांच्या लांबीमध्ये मोठी घट होऊन महानगरपालिकेच्या कोट्यवधी रुपयांची बचत होऊ शकते. अन्यथा अतिरिक्त मनुष्यबळ, वेतन, वाहनव्यवस्था, पर्यवेक्षण आणि प्रशासकीय खर्चामुळे सार्वजनिक निधीवर अनावश्यक आर्थिक भार पडण्याची शक्यता आहे.

याशिवाय, सदर निविदेमध्ये महानगरपालिकेतील कायमस्वरूपी झाडणकामगारांच्या सेवा, जबाबदाऱ्या, कार्यक्षेत्र आणि भविष्यातील भूमिकेबाबत कोणतीही स्पष्ट तरतूद नाही.

सध्या महापालिकेच्या वतीने उचलला जाणाऱ्या कचरा कर्मचाऱ्यांवर महापालिकेच्या वतीने एसआय, डीएसआय यांचे अंकुश आहे मात्र सदरचायसोपी मध्ये अशा प्रकारचा कोणताही उल्लेख दिसून येत नाही त्यामुळे या कर्मचाऱ्यांवर कोणाच्या अंकुश असणार यावर देखील मोठा प्रश्न उपस्थित आहे.

भविष्यात स्वच्छता व्यवस्थेचे संपूर्ण खासगीकरण झाल्यास त्यांच्या सेवा, हक्क, रोजगाराची सुरक्षितता, पदनियोजन आणि अनुकंपा नियुक्तीवर परिणाम होण्याची शक्यता असल्याने त्यांच्या हिताचे संरक्षण करणारे स्वतंत्र धोरण तातडीने जाहीर करावे, अशी मागणीही त्यांनी केली. सार्वजनिक निधीचा काटेकोर वापर सुनिश्चित करण्यासाठी रस्त्यांची लांबी, मनुष्यबळ, वाहनांची संख्या, सेवा शुल्क, प्रशासकीय खर्च आणि इतर सर्व आर्थिक बाबींचे स्वतंत्र तांत्रिक व आर्थिक लेखापरीक्षण करूनच निविदेला अंतिम मंजुरी द्यावी. तांत्रिक अचूकता, आर्थिक शिस्त, प्रभावी प्रशासकीय नियंत्रण, विद्यमान स्वच्छता यंत्रणेचे संरक्षण, कायमस्वरूपी कर्मचाऱ्यांचे हित आणि नागरिकांना दर्जेदार स्वच्छता सेवा या सर्व बाबींचा समतोल साधूनच ही निविदा अंतिम करण्यात यावी, अशी भूमिका काकासाहेब चव्हाण यांनी मांडली.

## थोडक्यात पण महत्वाचे



### अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप

धायरी (आरंभ पर्व) : साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या १०६ व्या जयंतीनिमित्त अखिल धायरी गाव अण्णाभाऊ साठे युवा संघटनेच्या वतीने विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. यंदा संघटनेच्या अण्णाभाऊ साठे जयंती उत्सवाचे ३० वे वर्ष असल्याने हा सोहळा विशेष उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्ताने परिसरातील गरजू विद्यार्थ्यांना मोफत शालेय साहित्याचे वाटप करून शिक्षणाला प्रोत्साहन देण्यात आले. गेल्या तीन दशकांपासून अण्णाभाऊ साठे यांच्या विचारांचा वारसा जपत संघटनेच्या वतीने जयंतीनिमित्त विविध सामाजिक उपक्रम सातत्याने राबविण्यात येत आहेत. यंदाही आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करून त्यांच्या शिक्षणासाठी मदतीचा हात पुढे करण्यात आला. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे गटनेते नगरसेवक काकासाहेब चव्हाण, प्रदेश काँग्रेस सचिव श्रीरंग (नाना) चव्हाण, काँग्रेसचे नेते धनंजय पाटील,माजी जिल्हा परिषद सदस्य सुरेखा दमीष्टे, किशोर पोकळे, बापूसाहेब पोकळे आणि तुषार पोकळे उपस्थित होते. यावेळी सागरभाऊ लोणारे, संतोष भाऊ लोणारे, सूर्यकांत भाऊ लोणारे, रवी अण्णा लोणारे, मनोज लोणारे, सोमनाथ लोणारे, सनी घाटे, शुभम आढागळे, देविदास लोणारे, रोहन लोणारे यांच्यासह असंख्य ग्रामस्थ, महिला, विद्यार्थी आणि कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रम यशस्वी केला. अण्णाभाऊ साठे यांच्या समता, शिक्षण आणि सामाजिक न्यायाच्या विचारांचा वारसा जपत समाजोपयोगी उपक्रम राबविण्याची परंपरा अखिल धायरी गाव अण्णाभाऊ साठे युवा संघटनेने कायम ठेवली असून, जयंती उत्सवाच्या ३० व्या वर्षानिमित्त राबविण्यात आलेल्या या उपक्रमाचे परिसरातून कौतुक होत आहे.



### अभिनव कॉलेज रस्ता की जलतरण तलाव? नागरिकांच्या संयमाचा अंत!

पुणे (आरंभ पर्व) : सिंहगड रोड परिसरातील अभिनव कॉलेज ते नंदनवन सोसायटी दरम्यानचा मुख्य रस्ता अखेर रस्ता राहिलाय की जलतरण तलाव, असा प्रश्न नागरिकांना पडला आहे. अवघ्या काही तासांच्या पावसात या रस्त्यावर तब्बल २ ते ३ फूट पाणी साचत असून महिला, विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक, दुचाकीस्वार आणि चारचाकी चालकांना अक्षरशः जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. अनेक वाहने बंद पडत असून नागरिकांचे मोठ्या प्रमाणावर आर्थिक आणि मानसिक नुकसान होत आहे.या गंभीर प्रश्नाबाबत नगरसेवक हरिदास चरवड यांनी २४ जुलैपासून पुणे महानगरपालिकेच्या प्रशासनाकडे सातत्याने पाठपुरावा केला आहे. मुख्य अधिकारी, कार्यकारी अभियंते, उपअभियंते ते कनिष्ठ अभियंते अशा सर्व स्तरांवर पत्रव्यवहार, दूरध्वनीद्वारे संपर्क आणि प्रत्यक्ष भेटी घेऊनही प्रशासनाने अद्याप ठोस कार्यवाही सुरू केलेली नाही. प्रशासनाच्या या निष्क्रिय आणि उदासीन भूमिकेविरोधात हरिदास चरवड यांनी आज पाणी साचलेल्या ठिकाणी प्रत्यक्ष भेट देऊन तीव्र संताप व्यक्त केला. नागरिकांच्या जीवाशी खेळ करणाऱ्या या हलगर्जीपणाचा त्यांनी निषेध करत त्वरित कायमस्वरूपी उपाययोजना करण्याची मागणी केली. "नागरिकांना दर पावसात जलसमाधीचा अनुभव देणारे प्रशासन आता जागे व्हावे. अन्यथा येत्या ४ ऑगस्ट रोजी नागरिकांसह तीव्र लोकआंदोलन (मोर्चा) छेडण्यात येईल आणि त्याची संपूर्ण जबाबदारी प्रशासनाची राहील," असा इशारा हरिदास चरवड यांनी दिला.



### धायरी ते सारसबागपर्यंत अण्णाभाऊ साठे जयंतीनिमित्त भव्य मिरवणूक

पुणे (आरंभ पर्व) : लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त धायरी येथे बहुजन समाज पार्टीच्या वतीने धायरी ते सारसबाग अशी भव्य-दिव्य मिरवणूक उत्साहात काढण्यात आली. सामाजिक ऐक्य, समता आणि परिवर्तनाचा संदेश देणाऱ्या या मिरवणुकीत शेकडो कार्यकर्ते व नागरिक सहभागी झाले होते. या मिरवणुकीचे आयोजन बहुजन समाज पार्टीचे बारामती लोकसभा प्रभारी अरुणअण्णा गायकवाड यांनी केले होते. यावेळी बसपा खडकवासला विधानसभा प्रभारी मुकेश शेलार, गणेश क्षीरसागर, सुरज धावरे, भगवान वाघमारे , सुनील धावरे यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. मिरवणुकीदरम्यान आयोजक अरुणअण्णा गायकवाड यांनी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांनी दिलेला समता, बंधुता आणि सामाजिक न्यायाचा संदेश समाजाच्या प्रत्येक घटकापर्यंत पोहोचविण्याचे आवाहन केले. समाजातील सर्व घटकांनी एकत्र येऊन सामाजिक परिवर्तनासाठी कार्य करण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. यावेळी बसपा विधानसभा प्रभारी मुकेश शेलार यांनी अण्णाभाऊ साठे यांच्या विचारांचा वारसा जपण्यासाठी समाजाने एकजुटीने पुढे येणे आवश्यक असल्याचे सांगितले. अण्णाभाऊंची जयंती ही केवळ उत्सव नसून त्यांच्या विचारांना कृतीत उतरविण्याची प्रेरणा असल्याचे त्यांनी नमूद केले. या मिरवणुकीला नांदेड सिटी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक अतुल बोस यांनी भेट देत बंदोबस्ताची पाहणी केली. डीजेच्या तालात आणि उत्साहपूर्ण वातावरणात धायरी ते सारसबाग ही मिरवणूक शांततेत व जल्लोषात पार पडली.

# तळमाचीवाडी येथे अतिवृष्टीमुळे भूस्खलन

## ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण



**जुन्नर (दै. आरंभ पर्व)**

आदिवासी भागातील तळमाचीवाडी ता.जुन्नर येथील तांबरी परिसरात राहणाऱ्या केशव उर्फ लालु साबळे यांच्या घराच्या वरील बाजूस भूस्खलन झाल्याने ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. पावसामुळे येथे पडलेल्या मोठ्या भेगा व भूस्खलन यामुळे तळमाची ग्रामस्थ जीव मुठीत धरून जगत आहे.

येथे रविवारी ता.१२ जुलै पासून अतिवृष्टीमुळे पुन्हा एकदा जमिनीस भेगा पडण्यास सुरवात झाली. दौडया डोंगराच्या पायथ्याशी असलेल्या वाडीच्या वरील बाजूला २००५ पासून जमिनीत भेगा पडत आहेत.यावर्षी रविवारी दि. १२ रोजी गावकऱ्यांना पुन्हा भेगा पडल्याचे आढळून आले. त्याचे फोटो सर्कल व तलाठी यांना पाठविण्यात आले त्यानुसार त्यांनी सोमवारी प्रत्यक्ष येऊन पाहणी केली. त्यांनी आपला अहवाल तहसीलदारांना पाठविला असल्याचे सांगितले. शनिवार ता.१८ रोजी सहा ग्रामस्थांना आपण सुरक्षित ठिकाणी स्थलांतरित व्हावे अशी नोटीस तहसीलदार यांनी दिली. या व्यतिरिक्त कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही. तळमाचीवाडीच्या वरील बाजूस असलेल्या पलाडवाडी पासून काही मीटर अंतरावर पडलेली भेग सुमारे ७०० ते ८०० मीटर लांबीची आहे. कोणत्याही अधिकाऱ्याने प्रत्यक्ष जागेवर जाऊन पाहणी केली नाही अशी ग्रामस्थांची तक्रार आहे.

शासनाने पुनर्वसन बाधित तळमाची वाडी येथे भिंत बांधणे अपेक्षित होते मात्र तळमाची वाडीच्या संरक्षित वनराईला धक्का पोहोचून सदर भिंत बांधण्यात आली आहे. गावकऱ्यांनी सदर भिंत बांधण्यास विरोध होता. तरी देखील सार्वजनिक बांधकाम विभागाने ही भिंत बांधली. याबाबत तळमाचीवाडी ग्रामस्थांनी विशेष ग्रामसभा घेऊन सदर भिंत बांधण्यात येऊ नये सदर भिंतही पुनर्वसन जेथे होणार आहे त्या पुनर्वसन गावठाणा मध्ये बांधण्यात यावी असा ठराव केला.

शासनाने जमीन अधिग्रहण करून काही घरे बांधलेली आहेत परंतु त्याचा ताबा अद्याप पर्यंत कोणालाही देण्यात आला नाही सदर जागेवरील घरांवरही काही लोकांनी शासनाच्या संमतीशिवाय त्याचा ताबा घेतला असून तेथे त्यांनी काटेरी कुंपण टाकून तिथे लोकांस जाण्यासाठीही मज्जाव केला जात आहे. तसेच शेजारील वस्तीला जाण्याच्या रस्ताही येणे जाण्यासाठी मज्जाव केला जात आहे. भविष्यात तळमाची वाडी येथे काही आपत्कालीन परिस्थिती निर्माण झाल्यास पुनर्वसंच्या मोकळे जागेत स्थलांतर होऊ शकते. सदर रस्त्याची मोजणी होऊनही काही ग्रामस्थ तो रस्ता करण्यास मज्जाव करत आहेत तसेच तलाठी व सर्कल यांच्याकडूनही कोणतीही कारवाई होत नाही तसेच तेथील काही लोकांनी सदर रस्त्यावर पाणी सोडले आहे त्यामुळे तेथे मोठे खड्डे पडलेले आहेत व तो रस्ता वापरण्यायोग्य राहिला नाही याबाबतही तहसीलदार यांनी गंभीर त्यांनी दखल घेऊन सदर रस्ता हा अतिक्रमणापासून मुक्त करून आपत्कालीन व्यवस्था पूर्ण करण्यासाठी त्याची सज्जता करावी अशी ग्रामस्थांची व शेजारील वस्तीची मागणी आहे.

सध्या संरक्षण भिंत बांधलेले ठिकाणी तळमाची वाडीचे कोणतेही संरक्षण होत नाही किंवा तळमाची वाडीच्या वरचे बाजूस कोणती संरक्षण भिंत बांधली गेली नाही त्यामुळे तेथेही लोकांना सुरक्षित स्थळी हलवणे अत्यंत गरजेचे आहे मात्र प्रशासनाकडून दखल घेतली गेली नाही. सदर संरक्षण भिंतीचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे केले असून ग्रामस्थांच्या तसेच ग्रामपंचायतची कोणती परवानगी न घेता सदर काम हे बळजबरीने करण्यात आलेले आहे तरी काम त्वरित थांबवावे अशी ग्रामस्थांची भावना आहे सदर भिंतीमुळे वनराईचे मोठे नुकसान झाले आहे आणि जिथे गरज नसताना जेथे प्रचंड झाडांची संरक्षता असताना तिथेच भिंत बांधण्यात आलेली आहे आत्ताच्या ज्या भेगा पडलेल्या आहेत त्या भेगा संबंधित ठेकेदाराने सुरुंग उडवून तेथे दगडाचे खोदकाम केले आहे त्या जागी किंवा त्याच्या वरचे बाजूस सदर भेगांचे प्रमाण प्रचंड वाढलेले आहे याबाबतची तातडीने चौकशी करून योग्य ते कारवाई व्हावी अशी ग्रामस्थांची मागणी आहे.

> संरक्षण भिंतीच्या कामामुळेच मुळेच ही परिस्थिती पुन्हा उद्भवलली असल्याची ग्रामस्थांची भावना आहे. याबाबत तहसीलदारांनी चौकशी करून संबंधित ठेकेदारावर व अधिकाऱ्यांवर कारवाई करावी अशी ग्रामस्थांची मागणी आहे.




## शाळा गुणवत्ता मूल्यांकनात उच्छिल शाळेचे यश

**जुन्नर (दै. आरंभ पर्व)**

पश्चिम आदिवासी भागातील उच्छिल ता.जुन्नर येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेने 'शाळा गुणवत्ता मूल्यांकनात' उत्तुंग यश संपादन केले आहे. जुन्नर तालुक्यात २०२४-२५ च्या 'शाळा गुणवत्ता मूल्यांकन आणि आश्वासन आराखडा' (SQAAF) मूल्यांकनात शाळेने ८६.२ टक्के गुण मिळवून तालुक्यात (ए) श्रेणीत तृतीय क्रमांक पटकावला आहे. या दैदिप्यमान यशाबद्दल नारायणगाव येथे रविवार, दि. २ ऑगस्ट रोजी जुन्नर तालुका प्राथमिक शिक्षक सहकारी पतसंस्थेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत शाळेला विशेष सन्मानित करण्यात आले . यावेळी आमदार शरद सोनवणे ,सभापती कमल शेळकंदे , जिल्हा परिषद सदस्या माई लांडे ,शिक्षक पतसंस्थेचे सभापती सचिन मुळे, केंद्रप्रमुख मधुकर आढारी , पदवीधर शिक्षक सुभाष मोहरे, मुख्याध्यापिका स्मिता ढोबळे आणि उपशिक्षिका आरती मोहरे आदी मान्यवर उपस्थित होते.

## विशेष विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी मदतीचा हात

### धायरी कर्णबधिर मुलांच्या निवासी शाळेला ₹६४ हजारांचा धनादेश सुपूर्द



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

समाजात अनेक जण विविध क्षेत्रांत यश संपादन करत असतात; मात्र समाजातील गरजू आणि विशेष मुलांसाठी पुढे येऊन मदतीचा हात देणारे हातच खऱ्या अर्थाने समाजाचे आधारस्तंभ ठरतात. अशाच सामाजिक जाणिवेतून धायरी येथील कर्णबधिर मुलांच्या निवासी शाळेतील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक आणि दैनंदिन गरजांसाठी ₹६४,००० रुपयांचा धनादेश (चेक) सुपूर्द करण्यात आला.

कर्णबधिर विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात सक्षमपणे उभे करण्यासाठी कार्यरत असलेल्या या निवासी शाळेत अनेक विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. त्यांच्या शिक्षणात कोणतीही अडचण येऊ नये, आवश्यक साहित्य, सुविधा आणि शैक्षणिक उपक्रमांना बळ मिळावे या उद्देशाने ही आर्थिक मदत देण्यात आली. या मदतीमुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंदाचे हास्य फुलले असून, समाजात अजूनही संवेदनशील माणुसकी जिवंत असल्याची भावना व्यक्त होत आहे.

ही मदत महावितरणचे अभियंता दीपक बाबर, सामाजिक कार्यकर्ते रमेशबापू गायकवाड, भाजपचे पुणे जिल्हा उपाध्यक्ष अनिल मते यांनी केली.

मान्यवरांच्या हस्ते शाळा प्रशासनाकडे धनादेश सुपूर्द करण्यात आला. यावेळी उपस्थितांनी विशेष मुलांच्या शिक्षणासाठी समाजातील प्रत्येकाने आपल्या परीने योगदान देण्याची गरज व्यक्त केली. आर्थिक मदतीपेक्षा अशा विद्यार्थ्यांना मिळणारा आत्मविश्वास आणि समाजाचा आधार अधिक महत्त्वाचा असल्याचे मतही यावेळी मांडण्यात आले. शाळा प्रशासनाने या मदतीबद्दल सर्व मान्यवरांचे मनःपूर्वक आभार मानले. अशा सामाजिक उपक्रमांमुळे गरजू विद्यार्थ्यांना नवी उमेद, शिक्षणाची नवी ऊर्जा आणि उज्ज्वल भविष्याची आशा मिळत असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

## नऱ्हे येथे NCMC स्मार्ट कार्ड नोंदणी शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद

### हजारो महिलांनी घेतला लाभ



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

नऱ्हे व परिसरातील महिला भगिनीसाठी व ज्येष्ठ नागरिकांसाठी NCMC स्मार्ट कार्ड नोंदणी शिबिराला नागरिकांचा, विशेषतः महिलांचा, उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. शासनाच्या महिला सवलत योजनेचा लाभ घेण्यासाठी हजारो महिलांनी या शिबिरात उपस्थित राहून NCMC स्मार्ट कार्डची नोंदणी केली. सकाळपासूनच शिबिरस्थळी महिलांची मोठी गर्दी पाहायला मिळाली. महिला प्रवाशांना एसटी प्रवासात मिळणाऱ्या ५० टक्के सवलतीचा लाभ सहज मिळावा, यासाठी आवश्यक असलेली स्मार्ट कार्ड नोंदणी या शिबिरात करण्यात आली. तसेच ज्येष्ठ नागरिक आणि अमृत ज्येष्ठ नागरिकांनीही मोठ्या संख्येने सहभाग नोंदवून शासनाच्या सवलतींचा लाभ घेण्यासाठी नोंदणी केली. शिबिरात आलेल्या नागरिकांना आवश्यक कागदपत्रांची तपासणी करून तत्परतेने नोंदणी प्रक्रिया पूर्ण करण्यात आली. त्यामुळे नागरिकांनी आयोजकांच्या नियोजनाचे कौतुक केले. या उपक्रमाचे आयोजन भाजप प्रभाग क्र. 34चे अध्यक्ष राजू प्रभाकर कुटे आणि भाजप महिला मोर्चा पुणे शहर उपाध्यक्ष कोमल सतीश कुटे यांच्या पुढाकाराने करण्यात आले. नागरिकांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ सुलभपणे मिळावा, यासाठी भविष्यातही असे उपक्रम राबविण्यात येणार असल्याचे आयोजकांनी सांगितले. शिबिरामुळे परिसरातील महिला, ज्येष्ठ नागरिक आणि प्रवाशांना मोठा दिलासा मिळाला असून, हजारो महिलांनी स्मार्ट कार्ड नोंदणी करून शासनाच्या प्रवास सवलत योजनेचा लाभ घेतला.

## 'ओह माय डॉग' विशेष प्री-रिलीज स्क्रीनिंगला प्रेक्षकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

७ ऑगस्ट रोजी संपूर्ण देशभरातील चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होणाऱ्या 'ओह माय डॉग' या चित्रपटाच्या प्रदर्शनापूर्वी पुण्यात विशेष प्री-रिलीज स्क्रीनिंगचे आयोजन करण्यात आले. या खास कार्यक्रमाला अभिनेते जितेंद्र जोशी आणि विजय मिश्रा उपस्थित होते. स्क्रीनिंगनंतर त्यांनी माध्यम प्रतिनिधी आणि प्रेक्षकांशी संवाद साधत चित्रपटाविषयीच्या प्रतिक्रिया जाणून घेतल्या.




पुण्यातील प्रेक्षकांनी 'ओह माय डॉग' ला भरभरून प्रतिसाद दिला. चित्रपटाची भावनिक कथा, प्रभावी अभिनय आणि माणूस व कुत्रा यांच्यातील हृदयस्पर्शी नात्याचे संवेदनशील चित्रण याचे विशेष कौतुक करण्यात आले. अनेकांनी हा चित्रपट संपूर्ण कुटुंबाने एकत्र पाहावा असा असल्याचे सांगत, प्रेम, करुणा आणि सहानुभूतीचा संदेश देणारा हा चित्रपट सर्व वयोगटातील प्रेक्षकांच्या मनाला भिडणारा असल्याचे मत व्यक्त केले.

## डॉ. मणिभाई देसाई पतसंस्थेचे चेअरमन मा. श्री. राजेंद्र कांचन सहकारातील दिपस्तंभ




**उरुळी कांचन (दै. आरंभ पर्व)**

सामाजिक बांधिलकी जपत संस्थेने समाजोपयोगी उपक्रमांचीही समृद्ध परंपरा डॉ मणिभाई देसाई पतसंस्थेचे अध्यक्ष राजेंद्र कांचन यांनी निर्माण केली आहे. संस्था केवळ आर्थिक सेवा देणारी संस्था नव्हे तर समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध असलेली एक सामाजिक चळवळ म्हणून कार्यरत आहे. डॉ मणिभाई देसाई पतसंस्थेचे संस्थापक अध्यक्ष राजेंद्र ज्ञानोबा कांचन यांच्या वाढदिवसानिमित्त विविध शैक्षणिक उपक्रम राबविण्यात आले होते. 'आता थांबायचं नाय' याविषयी सुप्रसिद्ध व्याख्याते प्रा. डॉ.विनोद बाबर यांचे व्याख्यान झाले. तसेच कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून लोकसेवा आयोग महाराष्ट्र माजी अध्यक्ष किशोर राजेनिंबाळकर उपस्थित होते. डॉ मणिभाई देसाई पतसंस्थेने महाराष्ट्राच्या सहकार क्षेत्रात मानाचे स्थान मिळवले आहे. संस्थेचे कार्यक्षेत्र महाराष्ट्र राज्य आहे.

सध्या संस्थेच्या ११ शाखा कार्यरत असून त्यापैकी ४ शाखा स्वामालकीच्या इमारतीत आहेत. संस्थेचे भागभांडवल रु. १५.३४ कोटी, ठेवी रु. ३८६ कोटी, कर्जवाटप रु. २८९ कोटी, संमिश्र व्यवसाय ६७५ कोटी, गुंतवणूक रु. १३५ कोटी, ढोबळ नफा रु. ७ कोटी आणि निव्वळ नफा रु. ५.५४ कोटी इतका असून, स्थापनेपासून संस्थेचा लेखापरीक्षण वर्ग 'अ' कायम राखण्यात आला आहे. कोरोना कालावधी वगळता संस्थेने १५ टक्के लाभांश दिला असल्याचे मत डॉ मणिभाई देसाई पतसंस्थेचे संस्थापक अध्यक्ष राजेंद्र ज्ञानोबा कांचन यांनी व्यक्त केले.

यावेळी पुणे जिल्हा परिषद समाजकल्याण सभापती जितेंद्र बडेकर, पंचायत समिती सदस्या कोमल कांबळे, उपाध्यक्ष रामदास चौधरी, संचालक शरद वनारसे, रोहिदास उंद्रे, भाऊसाहेब कांचन, खेमचंद पुरुषवाणी, संजय टिळेकर, संजय कांचन, कांतीलाल चौधरी, अनिकेत कांचन, हभप जीवन शिंदे, धनसिंग पोंदकुले, सारिका काळभोर, कमल कांचन, प्रवीण दरेकर, मुख्य व्यवस्थापक लक्ष्मण वाल्हेकर, माजी जि.प.सदस्य महादेव कांचन, माजी सरपंच ज्ञानोबा कांचन, जेष्ठ नेते राजेंद्र टिळेकर, सरपंच मिलिंद जगताप, हेमलता बडेकर, संचिता कांचन, प्रकाश कुतवळ, ऋषीकेश भोसले, सुनिल तांबे, अजय पवार आदि सर्व शाखांचे शाखाधिकारी, कर्मचारी वर्ग, सभासद, खातेदार, सल्लागार आजी माजी पदाधिकारी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपाध्यक्ष रामदास चौधरी यांनी मानले. आभार संचालक शरद वनारसे यांनी केले तर सूत्रसंचालन समाधान अवचट यांनी केले.

दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) मा. श्री. लक्ष्मण साबळे (निवासी संपादक) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.

दैनिक आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा



## थोडक्यात पण महत्वाचे



### तानाजी कांबळे यांना 'समाज रत्न' पुरस्काराने गौरव

पुणे (आरंभ पर्व) : सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याची दखल घेत पुण्यातील सामाजिक कार्यकर्ते तानाजी कांबळे यांना शिवभिम महोत्सव २०२६ अंतर्गत 'समाज रत्न' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. इचलकरंजी येथे प्रहार सामाजिक संघटना, दिव्यांग क्रांती संघटना, दिव्यांग प्रहार चॅरिटेबल ट्रस्ट व शिवसेना (शिंदे गट) यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित सोहळ्यात हा सन्मान प्रदान करण्यात आला. या कार्यक्रमास आमदार व माजी राज्यमंत्री बच्चूभाऊ कडू, आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर, खासदार धैर्यशील माने आणि आमदार राहुल आवाडे यांची प्रमुख उपस्थिती होती. बच्चूभाऊ कडू यांच्या हस्ते तानाजी कांबळे यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला. सध्या पीएमपीएमएलमध्ये स्वारगेट आगारात वाहक म्हणून कार्यरत असलेले तानाजी कांबळे अनेक वर्षांपासून सामाजिक उपक्रमांमध्ये सक्रिय आहेत. रक्तदान शिबिरे, आरोग्य अभियान, वृक्षारोपण, महापुरुषांच्या जयंती उत्सवांचे आयोजन, दिव्यांग व निराधारांच्या प्रश्नांसाठी पाठपुरावा, शैक्षणिक शुल्कवाढीविरोधात जनजागृती तसेच विविध सामाजिक उपक्रमांत त्यांचा सातत्यपूर्ण सहभाग राहिला आहे. कोरोनाकाळातील उल्लेखनीय सेवेसाठी त्यांचा 'कोरोना योद्धा' म्हणून तसेच पीएमपीएमएलकडून 'आदर्श सेवक' सह विविध पुरस्कारांनी गौरव करण्यात आला आहे. 'समाज रत्न' पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल तानाजी कांबळे यांचे मित्रपरिवार, सहकारी कर्मचारी व नागरिकांकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.




### रोगांविरोधात बायरचे 'झिवाना™ स्मार्ट' बुरशीनाशक सादर

मुंबई (आरंभ पर्व) : बागायतदार शेतकऱ्यांना पिकांवरील विनाशकारी रोगांचा प्रभावीपणे सामना करता यावा यासाठी बायरने पुढच्या पिढीतील 'झिवाना™ स्मार्ट' हे नवीन बुरशीनाशक सादर केले आहे. डाऊनी मिल्ड्यू आणि लेट ब्लाइट यांसारख्या रोगांपासून उच्च मूल्याच्या फलोत्पादन पिकांचे संरक्षण करण्याच्या उद्देशाने हे उत्पादन विकसित करण्यात आले आहे. एफआरएसी गट ४९ अंतर्गत असलेल्या नवीन सक्रिय घटकाच्या साहाय्याने 'झिवाना™ स्मार्ट' द्राक्षे, काकडीवर्गीय पिके, बटाटा आणि टोमॅटोमधील रोगांवर प्रभावी नियंत्रण देते. त्यामुळे पिकांची गुणवत्ता टिकविणे, उत्पादकता सुधारणे आणि शेतकऱ्यांचा परतावा वाढविण्यास मदत होणार असल्याचे कंपनीने म्हटले आहे. तसेच रोगांमध्ये प्रतिरोधकता विकसित होण्याचा धोका कमी करण्याच्या दृष्टीने हे उत्पादन विकसित करण्यात आले आहे. डाऊनी मिल्ड्यू आणि लेट ब्लाइट हे फलोत्पादन पिकांवर परिणाम करणाऱ्या विनाशकारी रोगांपैकी प्रमुख रोग आहेत. या रोगांच्या नियंत्रणासाठी शेतकऱ्यांच्या पीक संरक्षणावरील खर्चाचा मोठा हिस्सा खर्च होतो. बदलते हवामान आणि दीर्घकाळ टिकणारी आर्द्रता यामुळे या रोगांचा प्रादुर्भाव वाढण्याची शक्यता असल्याने दीर्घकाळ संरक्षण देणाऱ्या उपायांची आवश्यकता वाढली आहे.

### हैदराबाद इंटरनॅशनल मशीन टूल अँड इंजिनिअरिंग एक्स्पोचे आयोजन

हैदराबाद (आरंभ पर्व) : हैदराबाद इंटरनॅशनल मशीन टूल अँड इंजिनिअरिंग एक्स्पोची 9वी आवृत्ती 20-24 ऑगस्ट 2026 दरम्यान हिटेक्स एक्झिबिशन सेंटर, हैदराबाद येथे आयोजित केली जाईल. आठ आवृत्त्यांच्या यशाच्या आधारावर, एचआयएमटीईएक्स २०२६ ही त्याची आतापर्यंतची सर्वात मोठी आवृत्ती असेल, जी 18,500 चौ.मी. मध्ये पसरलेली असेल, ज्यामुळे भारतातील सर्वात मोठ्या मशीन टूल आणि अभियांत्रिकी प्रदर्शनापैकी एक म्हणून त्याच्या स्थानाची पुष्टी होईल. पाच दिवसांच्या या प्रदर्शनात 350+ प्रदर्शक, 1,000+ लाइव्ह मशीन्स असतील आणि भारतभरातून 20,000+ औद्योगिक अभ्यागतांना आकर्षित करण्याची अपेक्षा आहे. हा कार्यक्रम मशिन टूल्स, मेटलवर्किंग, ऑटोमेशन, रोबोटिक्स, टूलींग, डिजिटल मॅन्युफॅक्चरिंग आणि इंडस्ट्रियल इंजिनिअरिंगमधील अत्याधुनिक सोल्यूशन्स दाखवेल, ज्यामुळे उत्पादन उद्योगासाठी एक व्यापक सोर्सिंग आणि नेटवर्किंग प्लॅटफॉर्म तयार होईल. या वर्षीच्या आवृत्तीचे प्रमुख आकर्षण म्हणजे डिफॅक्ट – डिजिटल फॅक्टरी आणि कनेक्टेड टेक्नॉलॉजीज पॅव्हेलियन, थेट उत्पादन वातावरणात इंडस्ट्री 4.0 तंत्रज्ञानाचे प्रदर्शन करण्यासाठी डिझाइन केलेले. त्याच्या केंद्रस्थानी डिजिटल फॅक्टरी एक्सपीरिअन्स झोन आहे, जो पॅव्हेलियनसाठी नॉलेज पार्टनर ऑटोमेशन इंडस्ट्री असोसिएशनच्या सहकार्याने विकसित करण्यात आला आहे.

### योग्य वेळेची वाट पाहण्यापेक्षा नियमित गुंतवणुकीवर भर

share.market

नवी दिल्ली (आरंभ पर्व) : भारतातील रिटेल गुंतवणुकीचा प्रवास आता नव्या टप्प्यात प्रवेश करत आहे. संपत्ती निर्माण करणे ही आता एक सवय होऊ लागली आहे. प्रथमच गुंतवणूक करणारे बहुतांश गुंतवणूकदार शिस्तबद्ध गुंतवणुकीचा स्वीकार करत असल्यामुळे, दैनंदिन एसआईपी हा दीर्घकालीन संपत्ती निर्मितीचा प्रभावी पर्याय म्हणून पुढे येत आहे. दररोज केवळ ₹10 पासून गुंतवणूक करण्याची सुविधा उपलब्ध करून देत, फोनपे म्युच्युअल फंड्सने गुंतवणुक सुरू करण्याच्या मार्गातील अडथळा कमी केला आहे. त्याचबरोबर गुंतवणुकीतील एक मूलभूत तत्त्वही अधिक अधोरेखित केले आहे : योग्य वेळ साधण्यापेक्षा सातत्यपूर्ण गुंतवणूक अधिक महत्त्वाची. याचे प्रतिबिंब फोनपे म्युच्युअल फंड्सच्या दैनंदिन एसआईपी च्या आकडेवारीतून स्पष्टपणे दिसून येते. डिसेंबर 2025 मध्ये ही सुविधा सुरू झाल्यापासून या प्लॅटफॉर्मवर दैनंदिन एसआईपी करणाऱ्या 5 लाखांहून अधिक गुंतवणूकदारांनी नोंदणी केली आहे. यावरून छोट्या-छोट्या रकमेची, पण सातत्याने केली जाणारी गुंतवणूक स्वीकारण्याची प्रवृत्ती वेगाने वाढत असल्याचे दिसून येते. 2026 मध्ये या सुविधेला आणखी वेग मिळाला आहे. जानेवारी 2026 ते जून 2026 या कालावधीत फोनपे म्युच्युअल फंड्सच्या दैनंदिन एसआईपी च्या व्यवहारांमध्ये जवळपास 5 पट वाढ झाली.

# आ. शेखर निकम यांच्या पाठीशी ठामपणे उभा : महसूल मंत्री

**चिपळूण (दै. आरंभ पर्व)**

राज्याचे महसूल मंत्री चंद्रकांत बावनकुळे यांनी रत्नागिरी दौऱ्यादरम्यान सह्याद्री शिक्षण संस्था, सावर्डे तसेच आमदार शेखर निकम यांच्या संपर्क कार्यालयाला भेट देत त्यांच्या विकासाभिमुख कार्याचे जाहीरपणे कौतुक केले. "शेखर निकम उत्तम काम करतोय... मी त्याच्या पाठीशी ठामपणे उभा आहे," असे स्पष्ट शब्दांत सांगत त्यांनी निकम यांच्या नेतृत्वावर विश्वास व्यक्त केला. यावेळी बोलताना बावनकुळे म्हणाले की, चिपळूण-संगमेश्वर मतदारसंघातील महसूल



विभागाशी संबंधित प्रलंबित प्रश्न शासनाच्या पातळीवर प्राधान्याने मार्गी लावले जातील. आमदार शेखर निकम यांनी मांडलेले रास्त प्रश्न तत्काळ सोडविण्यासाठी शासन सकारात्मक भूमिका घेईल.

> यावेळी आमदार शेखर निकम यांनी मंत्री बावनकुळे यांचे स्वागत केले. संस्था कार्याध्यक्ष अनिरुद्ध निकम, जिल्हा परिषद सदस्या पूजा निकम, महायुतीचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. महसूल मंत्री चंद्रकांत बावनकुळे यांनी आमदार शेखर निकम यांच्या विकासकामांचे केलेले भरभरून कौतुक, मतदारसंघातील महसूल विषयक प्रश्न सोडविण्याची दिलेली ठाम ग्वाही आणि महायुतीतील त्यांच्या समन्वयक्षम नेतृत्वावर व्यक्त केलेला विश्वास हा या भेटीचा मुख्य केंद्रबिंदू ठरला.

तसेच पेढे गाव आणि नवीन कोळकेवाडी येथील प्रलंबित प्रश्नांवरही लवकरच सकारात्मक निर्णय घेतला जाईल, अशी ग्वाही त्यांनी दिली. महायुतीतील समन्वयाचे कौतुक करताना बावनकुळे म्हणाले, "महायुतीमध्ये उत्कृष्ट समन्वय राखणारा, सर्व घटकांना विश्वासात घेऊन विकासाचा रथ पुढे नेणारा आमदार म्हणजे शेखर निकम. महायुतीचे काम अधिक ताकदीने करा; राज्य शासन तुमच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे." भेटीदरम्यान विधानपरिषद आमदार प्रमोद जठार, आमदार विक्रांत पाटील, जिल्हाध्यक्ष सतीश मोरे, प्रशांत यादव यांच्यासह महायुतीचे अनेक पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी महसूल मंत्री बावनकुळे यांनी सह्याद्री शिक्षण संस्थेच्या शैक्षणिक उपक्रमांचा आढावा घेतला. कृषी महाविद्यालय, फूड टेक्नॉलॉजी तसेच विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांची माहिती जाणून घेत ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी संस्था करत असलेल्या गुणवत्तापूर्ण शैक्षणिक कार्याचे त्यांनी विशेष कौतुक केले.

## 'कोना कोना शिक्षा' उपक्रमातून ३.६ लाख तरुणांना वित्तीय साक्षरतेचे धडे

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

- **आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये २९३ शहरांतील ९०९ महाविद्यालयांमधील ७२ हजारांहून अधिक विद्यार्थ्यांपर्यंत पोहोच**

कोटक सिक्युरिटीज लिमिटेडने आपल्या प्रमुख सामाजिक उत्तरदायित्व उपक्रम 'कोना कोना शिक्षा' च्या माध्यमातून जुलै २०२१ पासून देशभरातील सुमारे ३.६ लाख तरुणांना वित्तीय साक्षरतेचे ज्ञान दिले आहे. आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये या उपक्रमाद्वारे २९३ शहरांतील ९०९ महाविद्यालयांमधील एकूण ७२ हजार ६२४ विद्यार्थ्यांपर्यंत पोहोच साधण्यात आली. नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ सिक्युरिटीज मार्केट्सच्या (एनआयएसएम) भागीदारीत हा उपक्रम राबविण्यात येत आहे. तरुणांमध्ये आर्थिक व्यवहारांविषयी जागरूकता निर्माण करून त्यांना योग्य आणि जबाबदार आर्थिक निर्णय घेण्यासाठी सक्षम करणे हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश आहे. कार्यक्रमांतर्गत विद्यार्थ्यांसाठी १० तासांचा संरचित अभ्यासक्रम तयार करण्यात आला आहे. यामध्ये वैयक्तिक वित्त व्यवस्थापन, गुंतवणुकीची मूलतत्त्वे, सिक्युरिटीज मार्केट आणि आर्थिक नियोजन अशा महत्त्वाच्या विषयांचा समावेश आहे. अभ्यासक्रम पूर्ण झाल्यानंतर विद्यार्थ्यांचे ऑनलाइन मूल्यमापन केले जाते आणि त्यांना एनआयएसएमचे प्रमाणपत्रही देण्यात येते. त्यामुळे विद्यार्थ्यांना व्यावहारिक तसेच उद्योग क्षेत्राशी संबंधित वित्तीय कौशल्ये आत्मसात करण्याची संधी मिळत आहे.

## भीती, विनोद अन् नाट्याची खमंग फोडणी

### 'तुंबाडची मंजुळा'चा ७ ऑगस्टला मराठी ZEE5 वर डिजिटल प्रीमियर

- **जितेंद्र जोशी, ओम भुतकर, मकरंद अनासपुरे, सई ताम्हणकर आणि उषा नाडकर्णी यांच्या प्रमुख भूमिका**

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

वर्षातील मोठ्या मराठी चित्रपटांपैकी एक ठरलेल्या 'तुंबाडची मंजुळा'चा जागतिक डिजिटल प्रीमियर ७ ऑगस्ट रोजी मराठी ZEE5 वर होणार आहे. चित्रपटगृहांमध्ये प्रेक्षकांचे प्रेम मिळवल्यानंतर भय, विनोद, नाट्य आणि भावनिक कथानकाची सांगड घालणारा हा चित्रपट आता डिजिटल माध्यमातून प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे.

विविध कोरगांवकर दिग्दर्शित आणि झी स्टुडिओज निर्मित 'तुंबाडची मंजुळा'मध्ये जितेंद्र जोशी, ओम भुतकर, मकरंद अनासपुरे, सई ताम्हणकर आणि उषा नाडकर्णी यांच्या प्रमुख भूमिका आहेत. भय-विनोद प्रकारातील या चित्रपटात मनोरंजनासोबत अंधविश्वास, सामाजिक पूर्वग्रह आणि माणुसकीचा संदेशही अधोरेखित करण्यात आला आहे.

चित्रपटाची कथा केशव या पात्राभोवती फिरते. केशव आपल्याला मंजुळा नावाच्या महिलेच्या आत्म्याने झपाटल्याचे खोटे सांगतो. त्याच्या या एका खोट्यामुळे संपूर्ण गावात गोंधळ उडतो. स्वतःची प्रतिष्ठा वाचवण्यासाठी सुरू झालेला खेळ पुढे भुतांच्या कथा, अंधश्रद्धा आणि अनपेक्षित घटनांच्या मालिकेत बदलतो. त्यातून निर्माण होणाऱ्या विचित्र परिस्थिती प्रेक्षकांना हसवतानाच कथेला भय आणि भावनांची किनार देतात.

चित्रपटाबाबत ZEE मराठीच्या चीफ चॅनल ऑफिसर आणि मराठी ZEE5च्या बिझनेस हेड हेमा व्ही. आर. यांनी सांगितले की, 'तुंबाडची मंजुळा' मराठी ZEE5 वर आणताना आनंद होत आहे. भीतीदायक थरार आणि पोट धरून हसायला लावणाऱ्या विनोदाचे मिश्रण असलेला हा चित्रपट संपूर्ण कुटुंबासाठी मनोरंजनाची मेजवानी ठरेल. कोकणच्या पार्श्वभूमीवर साकारलेली कथा आणि कलाकारांचा अभिनय प्रेक्षकांना नक्कीच गुंतवून ठेवेल.

दिग्दर्शक विविध कोरगांवकर म्हणाले की, प्रेक्षकांचे मनोरंजन करतानाच समाजाला आकार देणाऱ्या श्रद्धा आणि धारणांवर भाष्य करणारा चित्रपट तयार करण्याचा सुरुवातीपासून प्रयत्न होता. चित्रपटगृहांमध्ये मिळालेल्या प्रेमानंतर आता ZEE5च्या माध्यमातून हा चित्रपट अधिकाधिक प्रेक्षकांपर्यंत पोहोचणार असल्याचा आनंद आहे.

अभिनेता जितेंद्र जोशी म्हणाला की, केशवच्या एका छोट्याशा खोट्यामुळे अकल्पनीय गोंधळ निर्माण होतो आणि त्यातूनच या पात्राचा प्रवास अधिक मनोरंजक बनतो. चित्रपटगृहांतील




प्रेक्षकांचा प्रतिसाद उत्साहवर्धक होता आणि आता हा चित्रपट आणखी मोठ्या प्रेक्षकवर्गापर्यंत पोहोचणार असल्याचा आनंद आहे. सई ताम्हणकरनेही चित्रपटातील विनोद, भय आणि भावनांच्या मिश्रणाचे वैशिष्ट्य अधोरेखित केले. मनोरंजनासोबतच प्रेक्षकांना विचार करण्यासाठी काहीतरी अर्थपूर्ण देणारी ही कथा असून प्रेक्षक आपल्या कुटुंबासोबत या चित्रपटाचा आनंद घेतील, असा विश्वास तिने व्यक्त केला. भुतांची धमाल, गावातील गोंधळ, भावनिक प्रसंग आणि अनपेक्षित वळणांनी सजलेला 'तुंबाडची मंजुळा' ७ ऑगस्टपासून मराठी ZEE5 वर पाहता येणार आहे.

## आपल्या हक्काचा रस्ता संघर्ष समितीच्या पाठपुराव्याला यश

### महावितरणाकडून RMU Box स्थलांतर व ट्रान्सफॉर्मर सुरक्षित करण्याचे आश्वासन



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

नऱ्हेगाव, मानाजी नगर येथील जाधवर शाळेसमोरील सार्वजनिक रस्त्यावर बसविण्यात आलेल्या 11 kV Ring Main Unit (RMU) Box मुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होत असून नागरिक, विद्यार्थी आणि वाहनचालकांच्या सुरक्षिततेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला होता. या संदर्भात आपल्या हक्काचा रस्ता संघर्ष समिती यांनी महावितरणाकडे सातत्याने पाठपुरावा करून निवेदन सादर केले होते. समितीने सार्वजनिक सुरक्षेचा प्रश्न उपस्थित करत RMU Box तातडीने सुरक्षित ठिकाणी स्थलांतरित करावा तसेच रस्त्यावरील अडथळा दूर करावा, अशी मागणी केली होती. या मागणीची दखल घेत महावितरण, पर्वती विभाग, पुणे यांनी आवश्यक कार्यवाही करण्याचे आदेश दिले आहेत. याचबरोबर, जाधवर शाळेसमोरील ट्रान्सफॉर्मरला संरक्षक कुंपण (Safety Fencing) करून तो सुरक्षित करण्यात येईल, असे मा. निलेश श्रीकांत फलके, कार्यकारी अभियंता, पर्वती विभाग, महावितरण, पुणे यांनी समितीच्या शिष्टमंडळाला आश्वासन दिले आहे. या निर्णयामुळे परिसरातील शालेय विद्यार्थी, पालक, नागरिक आणि वाहनचालकांच्या सुरक्षिततेस मोठा दिलासा मिळणार असून, दीर्घकाळ प्रलंबित असलेल्या या प्रश्नाच्या निराकरणाची प्रक्रिया सुरू झाल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे. आपल्या हक्काचा रस्ता संघर्ष समिती यांनी महावितरण प्रशासनाचे आभार मानत, दिलेल्या आश्वासनानुसार RMU Box चे स्थलांतर आणि ट्रान्सफॉर्मरचे सुरक्षा कुंपणाचे काम लवकरात लवकर पूर्ण करावे, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

> समितीने स्पष्ट केले की, नागरिकांच्या सुरक्षिततेशी संबंधित प्रत्येक प्रश्नावर भविष्यातही कायदेशीर व लोकशाही मार्गाने सातत्याने पाठपुरावा केला जाईल.
>
> **– आपल्या हक्काचा रस्ता संघर्ष समिती प्रभाग क्र. ३४, नऱ्हेगाव – मानाजी नगर, पुणे**

## कॉग्निझंटकडून भारतातील १० हजार कर्मचाऱ्यांसाठी 'ओपनएआय कोडेक्स हॅकेथॉन'

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

cognizant

कृत्रिम बुद्धिमत्ता आणि तंत्रज्ञान सेवा क्षेत्रातील कॉग्निझंटने ओपनएआयच्या सहकार्याने प्रथमच जागतिक स्तरावरील 'कोडेक्स हॅकेथॉन'चे आयोजन केले. 'इंजिनिअरिंग द फ्रंटियर' या संकल्पनेवर आधारित या हॅकेथॉनमध्ये पुण्यासह चेन्नई, हैदराबाद, बेंगळुरू, कोईम्बतूर आणि कोची या सहा शहरांतील कॉग्निझंटचे सुमारे १० हजार कर्मचारी सहभागी झाले आहेत. या उपक्रमाच्या माध्यमातून कर्मचाऱ्यांना ओपनएआय कोडेक्सचा वापर करून शिकणे, प्रयोग करणे आणि विविध व्यावसायिक समस्यांवर कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित उपाय विकसित करण्याची संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे. कोडेक्स-बॅज प्राप्त व्यावसायिकांचा समूह वाढविणे आणि कृत्रिम बुद्धिमत्तेशी संबंधित कौशल्यांचा प्रत्यक्ष व्यावसायिक वापर करणे हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश आहे. यापूर्वी कॉग्निझंटला कृत्रिम बुद्धिमत्ता निर्मिती क्षमतांसाठी ओपनएआयकडून मान्यता मिळाली होती. जगभरातील उद्योग क्षेत्रातील ग्राहकांवर कोडेक्सचा होणारा परिणाम मोजण्यासाठी निवडण्यात आलेल्या आघाडीच्या जागतिक प्रणाली एकत्रीकरण कंपन्यांमध्ये कॉग्निझंटचा समावेश करण्यात आला आहे.

# स्वामी चिंचोलीचा ३०० वर्षांचा ऐतिहासिक वारसा

### पेशवेकालीन श्रीराम मंदिराच्या जीर्णोद्धारासाठी भाविकांना आवाहन

**मंदिराच्या जीर्णोद्धारासाठी सहकार्य किंवा अधिक माहितीसाठी भाविकांनी ९८५०२८६८८० किंवा ७०३००३५१२३ या क्रमांकांवर संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.**

- **नवसाला पावणारा श्रीराम म्हणून मंदिराची ख्याती**
- **शिखर व कळसाच्या जीर्णोद्धारासाठी सुमारे २५ लाखांचा खर्च अपेक्षित**





**(दै. आरंभ पर्व)**

पुणे-सोलापूर महामार्गावर पुण्यापासून सुमारे दोन तासांच्या अंतरावर असलेले स्वामी चिंचोली येथील इनामदारांचे पेशवेकालीन श्रीराम मंदिर सुमारे ३०० वर्षांचा ऐतिहासिक, धार्मिक आणि सांस्कृतिक वारसा जपत आहे. श्रीमंत बाजीराव पेशवे प्रथम यांच्या काळाशी संबंध सांगणारे हे मंदिर आजही हजारो भाविकांचे श्रद्धास्थान असून, रामनवमीच्या काळात येथे मोठी गर्दी होते.

स्थानिक परंपरेनुसार, सुमारे ३०० वर्षांपूर्वी श्रीमंत बाजीराव पेशवे प्रथम दक्षिणेकडील एका महत्त्वाच्या लढाईसाठी जात असताना त्यांची चिंचोली येथे प. पू. तुकाराम स्वामी यांच्याशी भेट झाली. तुकाराम स्वामींचा आशीर्वाद घेऊन पेशवे लढाईसाठी रवाना झाले आणि त्यात त्यांना विजय मिळाला. त्यानंतर तुकाराम स्वामींच्या आज्ञेनुसार पेशव्यांनी सुमारे १७३० च्या काळात चिंचोली येथे श्रीराम मंदिराची उभारणी केल्याचे सांगितले जाते. तुकाराम स्वामींच्या प्रभावामुळे पुढे गावाला 'स्वामींची चिंचोली' आणि कालांतराने 'स्वामी चिंचोली' असे नाव रूढ झाले. मंदिराच्या देखभालीसाठी पेशव्यांनी परिसरातील पाच गावे इनाम म्हणून दिल्याचीही स्थानिक परंपरा आहे. या इनामामुळे पुढील पिढ्यांमध्ये 'इनामदार' हे आडनाव रूढ झाल्याचे सांगितले जाते.

मंदिरातील दुर्मिळ मूर्ती ठरतात आकर्षण : या मंदिरात प्रभू श्रीराम, लक्ष्मण आणि सीता यांच्या संगमरवरी मूर्ती आहेत. त्यांच्यासमोर स्वयंभू दास मारुती विराजमान आहे. याशिवाय मंदिरामध्ये दुर्मिळ पंचमुखी शंकराची पिंड तसेच बिभीषणाची संगमरवरी मूर्तीही आहे. या वैशिष्ट्यांमुळे मंदिराचे धार्मिक महत्त्व आणखी वाढले आहे.

अपत्यप्राप्तीसाठी 'नवसाला पावणारा श्रीराम' अशी या मंदिराची भाविकांमध्ये विशेष श्रद्धा आहे. अनेक भाविकांना याची प्रचिती आल्याचे सांगितले जाते. त्यामुळे रामनवमीच्या दिवशी रामजन्म सोहळ्यानंतर नवविवाहित महिलांकडून 'रामबाळ' ओटीत घेण्याची परंपरा असून, त्यासाठी स्वतंत्र रांगही लावली जाते.

यंदा श्रीराम जानकी चॅरिटेबल ट्रस्ट आणि इनामदार कुटुंबीयांच्या वतीने मंदिराच्या जीर्णोद्धाराचे काम हाती घेण्यात आले आहे. पहिल्या टप्प्यात मंदिराचे शिखर आणि कळस यांचा जीर्णोद्धार करण्यात येणार असून, त्यासाठी सुमारे २५ लाख रुपये खर्च अपेक्षित आहे. या ऐतिहासिक आणि धार्मिक वारशाच्या जतनासाठी भाविकांनी यथाशक्ती आर्थिक देणगी देऊन सहकार्य करावे, असे आवाहन ट्रस्ट आणि इनामदार कुटुंबीयांनी केले आहे. 'कोणतीही रक्कम छोटी नसते, सद्भावना महत्त्वाची असते', या भावनेतून भाविकांनी या पवित्र कार्यात सहभागी व्हावे, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.


रामनवमीचा उत्सव उत्साहात : दरवर्षीप्रमाणे यंदाही मंदिरात श्रीरामनवमीचा उत्सव मोठ्या भक्तिभावात साजरा करण्यात आला. गुढीपाडव्याच्या दिवशी रामाचे नवरात्र बसवून उत्सवाला सुरुवात झाली. अष्टमीच्या दिवशी सकाळी समर्थ संप्रदायाच्या परंपरेनुसार भिक्षेची फेरी काढण्यात आली. रात्री छबिना काढण्यात आला. गावाच्या वेशीपर्यंत निघालेल्या या फेरीमध्ये श्रीरामाच्या विविध आरत्या आणि पदे उत्साहात गायली गेली. रामनवमीच्या दिवशी पवमान अभिषेक, रुद्र आदी धार्मिक विधींनी श्रीरामाच्या पूजेला प्रारंभ झाला. त्यानंतर ह.भ.प. सौ. मोहना नातू यांनी नारदीय कीर्तन सादर केले. कीर्तनानंतर पारंपरिक पद्धतीने रामजन्म सोहळा पार पडला. श्रीरामाच्या दर्शनासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली होती.

रामनवमीच्या रात्री परंपरेनुसार श्रीरामाची पालखीतून मिरवणूक काढण्यात आली.

यावेळी ग्रामस्थांनी विविध भक्तिगीते आणि पदे सादर केली. दुसऱ्या दिवशी दशमीला सकाळी मंदिरात 'प्रसन्न राघवा'ची पूजा करून उत्सवाची सांगता करण्यात आली. रामजन्म सोहळ्यावेळी राष्ट्रसंत व समर्थ भक्त मोहनबुवा रामदासी तसेच माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांची उपस्थिती विशेष ठरली.

**यंदाच्या उत्सवात इनामदार कुटुंबीय आणि श्रीराम जानकी चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने सुमारे ५ हजार भाविकांना उपवासाच्या खिचडीचा प्रसाद, तसेच सुमारे पाच हजार भाविकांना पिण्याच्या पाण्याचे वाटप करण्यात आले.**

## थोडक्यात पण महत्वाचे



### पुण्यात 'टू वाईज अॅकॅडमी'चे उद्घाटन

पुणे (आरंभ पर्व) : युवा शिक्षिका रेवा आकाश मेहता आणि दिया निलेश शाह यांनी सुरू केलेल्या 'टू वाईज अकॅडमी' या शैक्षणिक संस्थेचे रविवारी, दि. २ ऑगस्ट २०२६ रोजी प्रसाद अपार्टमेंट, टी.एम.व्ही. कॉलनी, गुलटेकडी, पुणे येथे उत्साहात उद्घाटन झाले. या उद्घाटन सोहळ्यास द बिशप्स स्कूल, पुणेच्या तिन्ही शाखांचे माजी प्राचार्य श्री. फ्रँक फ्रीस प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तसेच मा. सौ. सिद्धी अविनाश शिळीमकर, नगरसेविका, प्रभाग क्र. २१, पुणे महानगरपालिका यांनीही कार्यक्रमास उपस्थित राहून दोन्ही युवा संस्थापकांना त्यांच्या नव्या शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या. अवघ्या २४ वर्षांच्या रेवा आकाश मेहता, संस्थापक, टू वाईज अकॅडमी, यांनी पुण्यातील सिम्बायोसिस इन्स्टिट्यूट ऑफ बिझनेस मॅनेजमेंट येथून एमबीएचे शिक्षण पूर्ण केले असून त्यांना वरिष्ठ माध्यमिक स्तरावर अध्यापनाचा सहा वर्षांचा अनुभव आहे. त्यांनी यापूर्वी सिम्बायोसिस इंटरनॅशनल स्कूल, पुणे येथे वरिष्ठ माध्यमिक विभागात शिक्षिका म्हणूनही काम केले आहे. व्यवस्थापनाचे उच्च शिक्षण घेत असतानाही विद्यार्थ्यांसोबत काम करण्याची आणि शिकवण्याची आवड अधिक दृढ होत गेल्याने शिक्षण क्षेत्रातच स्वतःचे कार्य उभारण्याचा त्यांनी निर्णय घेतला.

### एमके२५० ब्ल्यूटूथ कॉम्बोची सुरुवात

मुंबई (आरंभ पर्व) : लॉजिटेक (सिक्स: एलओजीएन) (नॅसडॅक:लॉजी) तर्फे आज त्यांच्या ऑल न्यू अशा एमके २५० ब्ल्यूटूथ माऊस आणि कीबोर्ड कॉम्बो सह के २५० ब्ल्यूटूथ कीबोर्ड ची भारतात सुरुवात करत असल्याची घोषणा करण्यात आली. या नवीन सुरुवातीमुळे लॉजिटेक ने आता त्यांच्या विश्वसनीय गुणवत्तेसह डिझाईन मधील कुशलता परवडणाऱ्या कॉम्बो मध्ये आणले असून पहिल्यांदाच वायरलेसचा वापर करणाऱ्यांसाठी सुयोग्य उपकरणे आणली आहेत. या आधुनिक आणि कॉम्पॅक्ट उत्पादनांचे डिझाईन अशा लोकांसाठी आहे जे कोणतीही तडजोड न करता, अजोड ब्ल्यूटूथ कनेक्टिव्हिटीसह आरामदायकता आणि स्वच्छ, टिकाऊ डिझाईन सह कामा बरोबरच रोजचे मल्टिटास्किंग करु इच्छितात. कार्यक्षमता आणि सहजतेचा परिपूर्ण संगम शोधणाऱ्या वापरकर्त्यांसाठी एमके २५० कॉम्बो अतिशय योग्य आहे, बहुआयामी अशा के २५० ब्ल्यूटूथ कीबोर्ड सह एम १९६ वायरलेस माऊस ही जोडी अतिशय परिपूर्ण आणि आधुनिक सेटअप साठी उत्तम आहे. यामुळे जोडी पूर्ण होऊन आधुनिक सेटअप सह सोपा, परवडणारा आणि रोजच्या कार्यक्षमतेसाठी उत्तम पर्याय ठरतो. त्यातील स्टॅन्डआऊट वैशिष्ट्यांसह के २५० ब्ल्यूटूथ की बोर्ड असून या कॉम्बो मध्ये एम १९६ माऊस चे डिझाईन हे दोन्ही हातांनी माऊसचा वापर करणाऱ्यांसाठी करण्यात आले आहे. एम १९६ माऊस मुळे आरामदायक, अचूक नेव्हिगेशन हे आरामदायक ऑप्टिकल ट्रॅकिंग आणि फ्लुईड लाईन बाय लाईन स्क्रोलिंग साठी योग्य आहे. विश्वसनीय आणि टिकाऊ अशी ही एमके २५० कॉम्बोची जोडी १२ महिन्यांच्या बॅटरी लाईफ सह दोन्ही माऊस आणि की बोर्डना देते.

### शशिकांत कांबळे यांचा श्रीकांत शिंदे यांच्या हस्ते शिवसेना पक्षात प्रवेश



पुणे (आरंभ पर्व) : पद्मा फाउंडेशनचे संस्थापक शशिकांत कांबळे यांनी नवी दिल्ली येथे शिवसेना पक्षात जाहीर प्रवेश केला. शिवसेना पक्षाचे संसदीय गटनेते व खासदार डॉ. श्रीकांत शिंदे, तसेच खासदार ओमराजे निंबाळकर यांच्या उपस्थितीत हा प्रवेश सोहळा पार पडला. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली शशिकांत कांबळे जनहिताचे काम करतील, असा विश्वास पक्षाच्या वतीने व्यक्त करण्यात आला. सामाजिक, पर्यावरणीय तसेच जनहिताच्या विविध विषयांवर पद्मा फाउंडेशनच्या माध्यमातून काम करत असताना समाजातील सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नांना न्याय मिळवून देण्यासाठी अधिक व्यापक स्तरावर काम करण्याची गरज असल्याची भावना श्री. शशिकांत कांबळे यांनी यावेळी व्यक्त केली. पुण्यासह संपूर्ण महाराष्ट्रात सामाजिक व जनहिताच्या विविध उपक्रमांना अधिक व्यापक स्वरूप देण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला. "समाजसेवेचा अनुभव आणि जनतेशी असलेला थेट संपर्क याचा उपयोग करून सर्वसामान्य नागरिक, युवक, महिला तसेच पर्यावरणाशी संबंधित प्रश्नांसाठी अधिक प्रभावीपणे काम करण्याचा माझा प्रयत्न राहील. शिवसेना पक्षाच्या माध्यमातून महाराष्ट्राच्या विकासासाठी आणि जनहितासाठी प्रामाणिकपणे काम करणार आहे," असे शशिकांत कांबळे यांनी सांगितले.

### चंदीप सिंग यांच्या ऐतिहासिक ७,००० हून अधिक किमीची मोहिम यशस्वी



पुणे (आरंभ पर्व) : ह्युंदाई मोटर इंडिया लिमिटेडने (एचएमआयएल) आपल्या 'समर्थ बाय ह्युंदाई' या उपक्रमांतर्गत आंतरराष्ट्रीय पॅरा- अॅथलीट चंदीप सिंग यांना विशेषरित्या डिझाइन केलेल्या ह्युंदाई क्रेटामधून काश्मीर ते कन्याकुमारी आणि परत असा ७,००० हून अधिक किलोमीटरचा प्रवास यशस्वीपणे पूर्ण करण्यासाठी सहकार्य केले. असामान्य धैर्य, चिकाटी आणि अॅक्सेसिबल मोबिलिटीच्या सामर्थ्याचे दर्शवत चंदीप सिंग यांनी ही विक्रमी मोहीम यशस्वीपणे पूर्ण केली आणि 'गोल्डन बुक ऑफ रेकॉर्ड्स' मध्ये मानाचे स्थान मिळवले. विशेषरित्या तयार करण्यात आलेल्या ह्युंदाई क्रेटा ने चंदीप सिंग यांना भारतातील पॅरा-अॅथलीट कडून भारतातील सर्वात लांब क्रॉस-कंट्री ड्राईव्हपैकी एक यशस्वीपणे पूर्ण करता आली.

### पाणीकपात रद्द, खडकवासल्यात मुबलक पाणीसाठ्यामुळे चिंता मिटली

पुणे (आरंभ पर्व) : पुणेकरांसाठी मोठी आनंदाची बातमी आहे. पुणे शहरातील लागू असलेली पाणीकपात पूर्णपणे रद्द करण्यात आली आहे. पुणे महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी ही माहिती दिली. पुण्याला पाणीपुरवठा करणाऱ्या धरणांमध्ये मुबलक पाणीसाठा जमा झाल्यामुळे महापालिकेने हा निर्णय घेतला आहे. पुण्याला पाणीपुरवठा करणारे सर्व धरणे सुमारे १०० टक्के भरला असल्याचे आयुक्त राम यांनी सांगितले. खडकवासला, पानशेत आणि वरसगाव ही धरणे १०० टक्के भरली असून टेमघर धरण ९८ टक्के भरले आहे.

# प्रशासन अपघाताची वाट पाहत आहे का?

## वडगाव-नवले ब्रिज परिसरातील सर्व्हिस रोडवर खड्ड्यांचे साम्राज्य

**पुणे-लक्ष्मण साबळे (दै. आरंभ पर्व)**

वडगाव ब्रिज ते नवले ब्रिज परिसरातील सर्व्हिस रोडची अत्यंत दयनीय अवस्था झाली असून, संपूर्ण मार्गावर ठिकठिकाणी मोठमोठे खड्डे, चिखल आणि साचलेल्या पाण्यामुळे वाहनचालक व पादचाऱ्यांचे हाल होत आहेत. रोज हजारो नागरिक या मार्गावरून प्रवास करतात; मात्र प्रत्येक प्रवास धोकादायक ठरत असल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी आहे. पावसामुळे खड्ड्यांमध्ये पाणी व चिखल साचल्याने रस्त्याचा अंदाज येत नाही. विशेषतः दुचाकीस्वारांना घसरून अपघात होण्याचा धोका वाढला असून, चारचाकी वाहनांनाही वाहतूक करताना मोठी कसरत करावी लागत आहे. पादचाऱ्यांनाही चिखलातून मार्ग काढावा लागत असल्याने हा







सर्व्हिस रोड अक्षरशः खड्ड्यांच्या विळख्यात अडकला आहे. दैनिक आरंभपर्व पुणे ने ऑन द स्पॉट पाहणी केली असता, वडगाव ब्रिज ते नवले ब्रिज परिसरातील संपूर्ण सर्व्हिस रोडवर खड्डे, उखडलेला रस्ता आणि चिखलाचे साम्राज्य असल्याचे वास्तव समोर आले.

दैनिक आरंभपर्व On The Spot

नागरिकांनी अनेकदा तक्रारी करूनही अद्याप कायमस्वरूपी उपाययोजना झालेली नसल्याचा आरोप करण्यात येत आहे. त्यामुळे "एखादा गंभीर अपघात झाल्यानंतरच प्रशासनाला जाग येणार का?" असा संतप्त सवाल नागरिक उपस्थित करत आहेत. याबाबत राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे अभियंता अभिजीत गायकवाड यांनी सांगितले की, "सध्या सुरू असलेल्या पावसामुळे तातडीने डांबरीकरण करणे शक्य होत नाही. पावसाचा जोर कमी झाल्यानंतर हवामान अनुकूल होताच सर्व्हिस रोडसह महामार्गावरील सर्व खड्डे प्राधान्याने बुजविण्यात येतील." दरम्यान, स्थानिक नगरसेविका कोमल सारंग नवले यांनीही संबंधित विभागाकडे सर्व्हिस रोडची तातडीने दुरुस्ती करण्याची मागणी केली असून, नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने खड्डे त्वरित बुजवून रस्ता वाहतुकीस योग्य करावा, अशी भूमिका त्यांनी मांडली आहे.

तसेच सामाजिक कार्यकर्ते रमेश बापू गायकवाड यांनीही प्रशासनाने केवळ आश्वासनांवर न थांबता तात्काळ दुरुस्तीची कामे हाती घ्यावीत, अशी मागणी केली. खड्डे वेळेत बुजविल्यास संभाव्य अपघात टाळता येतील आणि हजारो नागरिकांचा दैनंदिन प्रवास सुरक्षित होईल, असे त्यांनी सांगितले. वडगाव-नवले ब्रिज परिसरातील राहणाऱ्या नागरिकांनी सर्व्हिस रोडवरील खड्डे तातडीने बुजवून सुरक्षित आणि सुरळीत वाहतुकीची व्यवस्था करावी. अशी मागणी केली आहे.



## अण्णाभाऊ साठे यांचे साहित्य जीवनवादी - अॅड. देवेंद्र बुट्टेपाटील

**राजगुरूनगर (दै. आरंभ पर्व)**

साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांनी त्यांच्या साहित्यातून दलित, शोषित, कष्टकरी, कामगारांची व्यथा मांडली. त्यांचे साहित्य जीवनवादी होते. उपेक्षितांचे अंतरंग समजून घ्यायचे असेल तर, विद्यार्थ्यांनी अण्णाभाऊ साठे यांची फकिरा कादंबरी आवर्जून वाचावी. असे आवाहन खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अॅड. देवेंद्र बुट्टेपाटील यांनी केले. ते हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात मराठी विभागाच्या वतीने साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलत होते. या प्रसंगी उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, डॉ. शिल्पा जगताप, उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, डॉ. बाळासाहेब अनुसे, प्रा. वैभवी कोपर्डे उपस्थित होते.

## हुमा कुरेशी आणि भूमि पेडणेकर 'लॉक अप: सच या सज़ा' मध्ये दाखल

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

नेटफ्लिक्सचा जागतिक स्तरावर ट्रेंडिंग कॅप्टिव्ह रिॲलिटी शो 'लॉक अप: सच या सज़ा' अंतिम आठवड्यात प्रवेश करत असताना, कोर्टरूममध्ये दोन उत्साही नवीन आवाजांचे स्वागत झाले. ह्यूमा कुरेशी आणि भूमी पेडणेकर यांनी 'जनता की आवाज' म्हणून 'लॉक अप' मध्ये प्रवेश केला. हाय-स्टेक्स जजमेंट डे मध्ये त्यांनी कैद्यांना भेट दिली, प्रेक्षकांनी वाट पाहिलेल्या प्रश्नांची उत्तरे विचारली आणि त्यांच्या गेमप्लेला कसून तपासलं. फिनाले जवळ येत असताना आणि प्रत्येक निर्णयाचे परिणाम अधिक गंभीर होत असताना, ह्यूमा आणि भूमी यांनी 'लॉक अप' मध्ये एका महत्त्वाच्या टप्प्यावर प्रवेश केला. बदलणारी समीकरणं, न सुटलेली स्पर्धा, कैद्यांचा प्रवास आणि त्यांचा





गेमप्ले या सर्वांवर त्यांनी स्वतःच्या दृष्टिकोनातून प्रश्न विचारले. जजमेंट डे मध्ये कठीण प्रश्न, थेट संवाद आणि अनपेक्षित क्षणांची भर पडली. आपल्या भेटीबद्दल बोलताना ह्यूमा कुरेशी म्हणाली, "लॉक अप हा खूपच अप्रतिम शो आहे. सध्या हा सर्वात व्हायरल शो आहे. मी तो फक्त नेटफ्लिक्सवरच नाही तर रील्समधूनही फॉलो करते. माझा इंस्टाग्राम अल्गोरिदम 'लॉक अप' ने भरलेला आहे. भूमी पेडणेकर म्हणाली, "मी 'लॉक अप' फॉलो करते आणि मला म्हणावं लागेल की नेटफ्लिक्सने आम्हाला पूर्णपणे एंटरटेन केलं आहे. मला कैद्यांना प्रत्यक्ष भेटायला खूप उत्साह होता. मी प्रश्न विचारले आणि माझ्या मनात असलेल्या सर्व शंका दूर केल्या. रितेश आणि फराह हे खूपच शानदार होस्ट्स आहेत. शोचा मजेदार भाग मोठ्या प्रमाणात त्यांच्यामुळेच येतो. ते कठीण प्रश्न विचारतात आणि ही जागा खूपच कठीण आहे स्पर्धकांना मार्गदर्शन आणि शिस्त लावणं पण त्यांनी ते खूपच उत्तमरीत्या केलं आहे." फिनाले आठवडा सुरू होताच आणि अंतिम रेषेपर्यंतची शर्यत तीव्र होत असताना, काही कैद्यांना ह्यूमा आणि भूमी यांनी कठीण प्रश्न विचारले. त्यांच्या भेटीमुळे गेममध्ये सर्वात महत्त्वाच्या क्षणी बदल झाला असण्याची शक्यता आहे. 'लॉक अप: सच या सज़ा' नेटफ्लिक्सवर दररोज, शनिवार ते शुक्रवार, रात्री 8 वाजता स्ट्रीमिंग होत आहे.

## इंडिया कौट्यूर वीकमध्ये 'इंद्रिया'च्या दागिन्यांची झळाळी

- हाऊस ऑफ मसाबासोबत विशेष सादरीकरण
- वारसा-प्रेरित सोने, टेम्पल कारागिरीसह पारंपरिक दागिन्यांना आधुनिक रूप

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

आदित्य बिर्ला समूहाचा ज्वेलरी ब्रँड 'इंद्रिया'ने इंडिया कौट्यूर वीक २०२६ मध्ये हाऊस ऑफ मसाबाच्या वधूवस्त्रांच्या प्रदर्शनासाठी खास दागिन्यांचे कलेक्शन सादर केले. भारतीय पारंपरिक कारागिरी आणि आधुनिक रचनाशैलीचा संगम असलेल्या या कलेक्शनने उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले.

हाऊस ऑफ मसाबाच्या पहिल्यावहिल्या वधूवस्त्र प्रदर्शनाच्या निमित्ताने हे विशेष कलेक्शन सादर करण्यात आले. परंपरेशी जोडलेली असतानाच स्वतंत्र विचार आणि स्वतःची वेगळी ओळख जपणाऱ्या आधुनिक भारतीय वधूची संकल्पना या सादरीकरणाच्या केंद्रस्थानी होती. इंद्रियाच्या या कलेक्शनमध्ये अभिजात पिवळे सोने, वारसा-प्रेरित अँटिक सोन्याचे दागिने,







नक्षीकाम असलेले टेम्पल दागिने, राजस्थानचे प्रसिद्ध 'आड' दागिने, नाजूक तारकामाची कारागिरी, मांग टिका तसेच सोन्यात मढवलेल्या रंगीबेरंगी मौल्यवान खड्यांच्या दागिन्यांचा समावेश होता. पारंपरिक कौशल्यासोबत आधुनिक जीवनशैलीला अनुरूप बहुउपयोगी दागिन्यांवरही विशेष भर देण्यात आला.

हाऊस ऑफ मसाबाच्या रंगीबेरंगी आणि वारसा-प्रेरित वधूवस्त्रांसोबत या दागिन्यांचे आकर्षक संयोजन करण्यात आले. त्यामुळे भारतीय कारागिरी, रंग आणि आधुनिक वैयक्तिक अभिव्यक्ती यांचा अनोखा मिलाफ पाहायला मिळाला.

जवळपास एका दशकानंतर इंडिया कौट्यूर वीकच्या मंचावर पुनरागमन करणाऱ्या सुपरमॉडेल मधू सप्रे यांच्यासह कॅरोल ग्रॅशियस, शीतल मल्लार आणि साक्षी सिंधवाणी यांसारख्या प्रसिद्ध मॉडेल्सच्या उपस्थितीने प्रदर्शनाची भव्यता आणखी वाढली.

इंद्रियाचे मार्केटिंग प्रमुख शांतीस्वरूप पांडा म्हणाले की, फॅशन आणि दागिने यांच्यात नेहमीच प्रभावी संवाद राहिला आहे. हाऊस ऑफ मसाबासोबतच्या या सहयोगातून भारतीय वारशात रुजलेले दोन सर्जनशील दृष्टिकोन एकत्र आले आहेत. भारताची समृद्ध दागिने परंपरा आधुनिक ग्राहकांच्या अपेक्षांनुसार सातत्याने विकसित होत असल्याचे या कलेक्शनमधून दिसून येते.

डिझायनर मसाबा गुप्ता यांनीही या सहयोगाबद्दल आनंद व्यक्त केला. इंद्रिया हा परंपरा आणि आधुनिकतेचा योग्य संगम साधणारा ब्रँड असून त्यातील दागिने रॅम्पसोबतच वैयक्तिक संग्रहाचाही भाग होऊ शकतात, असे त्यांनी सांगितले. आदित्य बिर्ला समूहाशी असलेल्या संबंधामुळे ब्रँडने ग्राहकांमध्ये विश्वास निर्माण केल्याचेही त्यांनी नमूद केले.

## सेंट अरनॉल्ड सेंट्रल स्कूलमध्ये 'आकार आणि सर्जनशीलता' प्रदर्शन

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

सेंट अरनॉल्ड सेंट्रल स्कूलमध्ये इयत्ता पहिली ते बारावीपर्यंतच्या विद्यार्थिनींसाठी विज्ञान, पर्यावरण, शेती, उद्योग आणि शिक्षण या विविध विषयांवर आधारित प्रकल्प प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले. या प्रदर्शनात विद्यार्थिनींनी कल्पकता, सर्जनशीलता आणि अभ्यासपूर्ण मांडणीचा उत्कृष्ट संगम सादर करत उपस्थितांची दाद मिळवली. प्रदर्शनातील विविध स्टॉल्समध्ये "Two-dimensional Shapes" या विषयावरील प्रकल्प विशेष आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरला. रंगीबेरंगी कागदापासून तयार करण्यात आलेले वर्तुळ, त्रिकोण, हृदय, तारे आदी विविध आकारांचे मॉडेल्स तसेच स्मितहास्य करणाऱ्या घड्याळाचे आकर्षक मॉडेल पाहुण्यांचे लक्ष वेधून घेत होते. या स्टॉलवर विद्यार्थिनी अद्विका कांबळे हिने आपल्या सहविद्यार्थिनींसह प्रकल्पाचे प्रभावी सादरीकरण केले. विद्यार्थिनींनी विविध आकारांचे महत्त्व, त्यांचा दैनंदिन जीवनातील



उपयोग आणि त्यामागील संकल्पना उपस्थितांना समजावून सांगितल्या. प्रदर्शनाला शाळेचे प्राचार्य फादर सुनील तसेच वर्गशिक्षिका सीमा अजय मॅडम यांनी भेट देऊन विद्यार्थिनींच्या प्रकल्पांची पाहणी केली. त्यांनी विद्यार्थिनींच्या सर्जनशीलतेचे, कल्पकतेचे आणि परिश्रमाचे कौतुक करत अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन, आत्मविश्वास आणि सादरीकरण कौशल्य विकसित होण्यास मोठी मदत होत असल्याचे सांगितले. यावेळी प्रदर्शनात विद्यार्थिनींनी तयार केलेली हस्तकला, "Shaped Monuments" आणि "Shape Faces" यांसारखे आकर्षक शैक्षणिक पोस्टर्सही प्रदर्शित करण्यात आले होते. प्रदर्शनाला शिक्षक, पालक आणि विद्यार्थ्यांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

# 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व महसूल समाधान शिबिर' यशस्वी

**राजगुरूनगर (दै. आरंभ पर्व)**

चांडोली (ता. खेड) येथील येथे आयोजित करण्यात आलेले 'छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिर' नागरिकांच्या उत्स्फूर्त प्रतिसादात यशस्वी झाले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा वाढदिवस तसेच माजी उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार यांच्या जयंतीचे औचित्य साधून खेड-आळंदी विधानसभा मतदारसंघाचे आमदार बाबाजी काळे यांच्या पुढाकाराने हे शिबिर आयोजित करण्यात आले होते.

या शिबिरात महसूल विभागासह विविध शासकीय विभागांच्या अधिकाऱ्यांनी





उपस्थित राहून नागरिकांच्या महसूल, जात व उत्पन्न प्रमाणपत्र, फेरफार, सातबारा, वारस नोंद, निवास, पुरवठा, शिक्षण, वन, कृषी तसेच विविध शासकीय योजनांशी संबंधित प्रश्नांवर मार्गदर्शन केले. अनेक अर्जांवर तातडीने कार्यवाही करण्यात आली, तर उर्वरित प्रकरणे संबंधित विभागांकडे प्राधान्याने निकाली काढण्यासाठी पाठविण्यात आली. यावेळी आमदार काळे यांनी नागरिकांशी थेट संवाद साधून त्यांच्या समस्या जाणून घेतल्या. शासनाच्या विविध योजना आणि सेवा सर्वसामान्य नागरिकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचविणे, नागरिकांना शासकीय कार्यालयांचे वारंवार हेलपाटे मारावे लागू नयेत आणि त्यांच्या प्रश्नांचे एकाच ठिकाणी जलद निराकरण व्हावे, या उद्देशाने अशा समाधान शिबिरांचे आयोजन करण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले. या शिबिरास उपविभागीय अधिकारी अनिल दौंडे, पंचायत समितीच्या सभापती विद्या मोहिते, तहसीलदार प्रशांत बेडसे, उपसभापती मंगेश सावंत, जिल्हा परिषद सदस्य विजयसिंह शिंदे, तनुजा घनवट, विनया मुंगसे, गणेश आरगडे, दिप्ती भोगाडे, गणेश बोत्रे, समीर सुपे, पंचायत समिती सदस्य माऊली ढेरंगे, दिलीप डुबे, गौरी मुऱ्हे, रुपाली कांबळे, सारिका गोगावले, प्रसाद घेनंद, कविता राक्षे, शंकर कावडे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती अशोक राक्षे, उपसभापती रणजीत गाडे, संदीप सोमवंशी, पोलीस पाटील संघटनेचे राज्याचे अध्यक्ष बाळासाहेब शिंदे, शेत पाणंद रस्ते सहअध्यक्ष शांताराम भोसले, नायब तहसीलदार मनीषा खैरे, रविंद्र मोरे, राम बीजे, निवासी नायब तहसीलदार चेतन मोरे, वन विभागाचे कंक, पुरवठा अधिकारी महादेव कुंभार, गटशिक्षणाधिकारी अमोल जंगले, तृप्ती मांडेकर, प्रिया पवार, संतोष गोरडे, काळुराम थोरवे, सयाजीराजे मोहिते तसेच महसूल व इतर शासकीय विभागांचे अधिकारी, कर्मचारी, पदाधिकारी आणि नागरिक उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आदेश टोपे आणि तुषार वाटेकर यांनी केले. शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी सर्व शासकीय अधिकारी, कर्मचारी, लोकप्रतिनिधी, पदाधिकारी, स्वयंसेवक आणि नागरिकांचे आमदार काळे यांनी आभार मानले.